**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले गणेश शिवाजीराव, : अपीलकर्ता
शिल्प निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा,
तालुका औसा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर - श्री. डी. आर. सर्जे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर - श्री. कलमे जी. आर. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, दिनांक १०-०९-२००९ रोजी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी तयार ठेवण्यात आली होती. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली आहे. तथापि आजपर्यंत अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात येऊन माहिती घेऊन गेलेले नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीचा एक संच आयोगास सादर केला. अतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जे त्यांच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचारी आहेत त्यांच्या निवासस्थानाच्या पत्त्यावर सदर माहिती नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. परवेज जानीमियॉ पठाण, : अपीलकर्ता
अकबरीया मस्जिद जवळ, पटेल चौक, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रशासक / प्राचार्य, एम. एस. बिडवे, अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, एम. एस. बिडवे, अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, प्रशासक / प्राचार्य, एम. एस. बिडवे, अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, एम. एस. बिडवे, अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - १) डॉ. ए. एम. चिमेगाव, २) श्री. पठाण नासेर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगास या व्दितीय अपील क्रमांक १६३४/२००९ च्या संदर्भात दिनांक ०३-०१-२०११ रोजीचा अर्ज केला आहे की, त्यांनी माहिती अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची आता त्यांना आवश्यकता नाही. त्यामुळे विचाराधीन अपील मागे घेत आहे.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. परवेज जानीमियॉ पठाण, अकबरीया मस्जिद जवळ, पटेल चौक, लातूर.

२. जन माहिती अधिकारी, प्रशासक / प्राचार्य, एम. एस. बिडवे, अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, एम. एस. बिडवे, अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंग नरहरीराव सोलंकी, : अपीलकर्ता
मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
संशोधन अधिकारी / सदस्य सचिव, विभागीय जात पडताळणी समिती, विभाग, औरंगाबाद विभाग क्रमांक १
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात पडताळणी समिती विभाग, औरंगाबाद क्रमांक १

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्रमांक १, औरंगाबाद<br>- श्रीमती छाया के. कुलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. एस. ए. सिद्दीकी, लघुलेखक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्रीमती उषा भिमराव सोळंके | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०७-२०१० च्या पत्रासोबत देण्यात आलेली आहे. त्यामध्ये एकूण ३७ पृष्ठांचा समावेश आहे. अपिलार्थीला ही माहिती मिळाली आहे अशी त्यांनी दिनांक ०९-०८-२०१० रोजी या पत्रावर नोंद केलेली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उशीर झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, जात पडताळणी समितीकडे जात पडताळणीकरिता दर महिन्यास हजारो प्रकरणे प्राप्त होतात. सन २००६ मध्ये औरंगाबाद महसूल विभागाकरिता एकच समिती होती व तदनंतर लातूर समितीची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे समितीच्या हस्तांतरण प्रक्रियेमध्ये अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंग नरहरीराव सोलंकी, मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी (जाप्रप), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विष्णू भगवानराव ढवळे,<br>ओंकार इलेक्ट्रॉनिक्स, ढोलेश्वर मंदिर परिसर, पैठण<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विष्णू भगवानराव ढवळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण - श्री. भास्कर नारायण वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. के. पी. विसपूते, अ. का. (म) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. ०५-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०५-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सध्याचे जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागितलेली माहिती बिपीएल, अंत्योदय व अन्नपूर्णा योजनेच्या पुस्तिका तयार करणेबाबतच्या अनुषंगाने आहे.

आज रोजी आयोगाने आदेशित करुन सुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी स्वतः, जन अपिलीय अधिकारी स्वतः तसेच त्रयस्थ तहसीलदार, पैठण आणि जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद हे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. अशा परिस्थितीत या प्रकरणात आयोगाला न्याय देणे शक्य वाटत नाही. म्हणून पुन्हा सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी स्वतः, जन अपिलीय अधिकारी स्वतः, तसेच त्रयस्थ म्हणून तहसीलदार, पैठण आणि जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांनी स्वतः विशेष साक्षीकरीता उपस्थित रहाणे आवश्यक राहील.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, तहसीलदार, पैठण (विशेष साक्षी) आणि जिल्हा पुरवठा अधिकारी, (विशेष साक्षी) जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विष्णू भगवानराव ढवळे, ओंकार इलेक्ट्रॉनिक्स, ढोलेश्वर मंदिर परिसर, पैठण

तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांची साक्ष आवश्यक असल्याने त्यांनी सुनावणीस उपस्थित रहावे.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहम्मद इक्रामुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्यूम, रा. ब्लॉक नं. ७३, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, चम्पा चौक, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, नगर भूमापन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहम्मद इक्रामुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्यूम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद - श्रीमती एस. पी. सेठीया | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद - श्री. कि. रा. तवरेज | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. व्ही. टी. मुळे, उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. चंद्रशेखर ठाकूर, कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.६ | श्री. सी. बी. बोर्डे, अधीक्षक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०२-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०८-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद, कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद व अधीक्षक, अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

विचाराधीन व्दितीय अपील क्रमांक १७१०/२००९ ची सुनावणी दिनांक ०१-१२-२०१० रोजी घेण्यात आली होती त्यावेळी फक्त अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी आयोगापुढे आलेल्या गोष्टी तसेच आयोगाचे अंतरीम आदेश खालीलप्रमाणे होते.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या अर्जान्वये त्यांची व्यक्तिगत माहिती मागितली होती. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी त्यांच्या वार्षिक वेतनवाढ व वेतननिश्चितीबाबत सन १९७८ चे आदेश मागितले आहेत. अपिलार्थीचे वय ७२ वर्षे असून अपिलार्थी जेष्ठ नागरिक आहेत. त्यांनी व्यक्तिशः त्यांची सेवाविषयक (सर्व्हिस मॅटर) मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न देण्याचा प्रमाद जन माहिती अधिकारी यांच्या हातून घडला आहे याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या सर्व माहितीच्या प्रमाणित साक्षांकीत प्रती उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद श्री. वसंत मुळे यांनी तयार करुन व्यक्तिशः पुढील सुनावणीच्या वेळी उपस्थित राहून ही कागदपत्रे आयोगास सादर करावीत या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालील अंतरीम आदेश देण्यात आले होते.

" या अपील प्रकरणाची सुनावणी आयोग पुढे ढकलत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०४-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता घेण्यात येईल त्यावेळी वर नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधित अधिका-यासह उपसंचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी व्यक्तिशः आयोगापुढे उपस्थित राहावे. "

आज दिनांक ०४-०१-२०११ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद हे व्यक्तिशः उपस्थित आहेत व त्यांना मदत करण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचारी वर नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने

मागितलेली दोन मुद्दयांवरची माहिती ही सन १९७७-७८ या कालावधीची आहे व ती शोधण्यासाठी आयोगाच्या आदेशाप्रमाणे कसोशीने प्रयत्न करण्यात आला आहे. त्याकरिता विविध कार्यालये जसे जमाबंदी आयुक्त, पुणे, संचालक, भूमि अभिलेख संचालनालय, पुणे, नगर भूमापन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद इत्यादी कार्यालयाकडे कसोशीने माहिती शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपसंचालक श्री. मुळे यांनी विशेष परिश्रम घेतल्याचे सुनावणीच्या वेळी आयोगासमोर दिसून आले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या दोन मुद्दयांपैकी नगर भूमापन अधिकारी यांच्या कार्यालयात सन १९७७-७८ साली परिरक्षक भूमापक म्हणून कार्यरत असताना दिनांक ०१-०७-१९७८ ची वेतनवाढ रोखल्याबाबतच्या सेवापुस्तिकेत नोंद घेतल्याच्या दिनांक ०१-०७-१९७८ च्या आदेशाची प्रत वर नमूद केल्याप्रमाणे सर्व ठिकाणी शोध घेऊनही प्राप्त होऊ शकली नाही. तथापि याला पूरक माहिती म्हणून या कालावधीतील सेवापुस्तिकेतील नोंदीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस आज आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आली व ती अपिलार्थीने स्विकारली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०१-०७-१९७७ रोजी केलेल्या वेतन निश्चितीची प्रत आणि दिनांक २८-०७-१९७९ च्या रजा मंजूरीचे आदेश आणि दिनांक ०१-०४-१९७९ च्या रजा मंजुरीचे आदेश याच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस पुरविण्यात आल्या. अपिलार्थी यांनी मागितलेली प्रथम मुद्दयावरील वेतनवाढ रोखल्याबद्दलच्या आदेशाची प्रत दस्तऐवज तपासूनही प्राप्त झाली नाही ही बाब अपिलार्थीस समजावून सांगण्यात आली.

या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील बंद करावे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे व त्यास सुनावणीच्या वेळी सर्वांनी सहमती दर्शविली आहे.

**आदेश**

प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद इक्रामुल्ला वल्द मोहम्मद अब्दुल कय्यूम, रा. ब्लॉक नं. ७३, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, चम्पा चौक, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल निवृत्तीराव जाधव, रा. लातूर : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय,
लातूर.

जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद कार्यालय,
लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर परिषद कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - नगर परिषद कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. दादाराव जाधव व बालाजी देशमुख | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | : | दि. १२-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | : | दि. १८-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | : | दि. ३०-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | : | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | : | दि. २५-०३-२००९ (फेरसादर दि.०५.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणात असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने दि. १२.११.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले पत्र कार्यालयातील मूळ संचिकेमध्ये उपलब्ध नाही, असे जन माहिती अधिकारी, नगर रचना विभाग, नगर परिषद कार्यालय,लातूर यांनी अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नसल्यामुळे प्रकरणातील सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. त्यामुळे सदर प्रकरण प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करावी.

अत: आयोगाच्या स्तरावर प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल निवृत्तीराव जाधव, वृंदावन, अश्वमेघ हॉटेलच्या पाठीमागे, श्रीकृष्ण मंदिराजवळ, श्रीनगर,लातूर

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कपिल दयानंद महिंद्रकर,<br>रा. पाखरसांगवी, ता.जि.लातूर. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२,<br>लातूर. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२,<br>लातूर. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर-प्रतिनिधी श्री. मुखम डी.एस.,जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सदस्य, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १५.०५.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती प्रकरण क्र. एल ६३५/०९ या प्रकरणाबाबतची असून संदर्भित प्रकरण निकाली निघालेले नसल्यामुळे निकालाची प्रत देता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी दि. १८.०७.२००९ रोजी कळविले आहे. सदरहू प्रकरणास आता अंतिम स्वरुप मिळाले असून याबाबतच्या छायांकित प्रती आता अपिलार्थीस द्याव्या लागतील. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज आयोगास असेही अवगत केले की, आता प्रकरण अंतिम झाले असून, जातीचे वैधता प्रमाणपत्र व जातीचे मूळ प्रमाणपत्र अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना दि. ११.०९.२००९ रोजी पाठविण्यात आलेली असून या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती तिकडून प्राप्त करुन घ्याव्यात, असे अपिलार्थीस कळविले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. तरी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उपरोक्त प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती द्याव्या लागतील.

यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या साक्षांकित छायांकित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कपिल दयानंद महिंद्रकर,रा. पाखरसांगवी, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा संधोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२ लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२ लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अभिमन्यू मारोतीराव पाखरसांगवे, : अपीलकर्ता
रा.निलंगा, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.क.मर्या.
विभागीय कार्यालय, निलंगा, जि. लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क.मर्या.विभागीय कार्यालय, निलंगा, जि. लातूर. | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क.मर्या.विभागीय कार्यालय, निलंगा, जि. लातूर- श्री. सुंदर श्यामराव लटपटे | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य अभियंता,महावितरण लातूर, श्री. रामराव ज्ञानोबा मुंडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-११-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-११-२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२-०१-२००९<br>(फेरसादर- ०२-१२-२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. मुख्य अभियंता, महावितरण, लातूर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अर्जदाराने मागितलेल्या माहितीकरिता आवश्यक ते शुल्क भरणा करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.११.२००८ रोजी अपिलार्थीस कळविले आहे व शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दि. ०३.१२.२००८ रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली आहे, असे त्यांनी त्याच पत्रावर दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येत आहे. तथापि सदरील माहिती अपूर्ण आहे, अशी त्यांनी नोंद केलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीशी त्यांनी केलेल्या चर्चेमध्ये असे आढळून आले आहे की, त्यांना वापरलेल्या साहित्याची फिडरनिहाय, सबस्टेशननिहाय व गावनिहाय वर्गवारी करुन हवी आहे. परंतु अशी वर्गवारी केलेली माहिती त्यांच्या अभिलेखात ठेवण्याची पध्दत प्रचलित नाही आणि त्यांनी आयोगास असेही सांगितले की, मोजमापपुस्तिकेची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे, यामध्ये वापरलेल्या साहित्याची नोंद आहे, त्यावरुन ती माहिती अपिलार्थीस मिळू शकते.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

तथापि वरील पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभिमन्यु मारोतराव पाखरसांगवे, रा.नारायणनगर, निलंगा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, वि.का.महावितरण, निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय,निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सौदागर म.रफि पाशामियॉ,<br>रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधीक्षक,<br>जिल्हा कार्यालय, लातूर. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पोलीस अधीक्षक,<br>जिल्हा कार्यालय,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सौदागर म.रफि पाशामियॉ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०५-२००९<br>(फेरसादर -१४-१२-२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी दि. ०७.०१.२००९ रोजीच्या अर्जान्वये दोन मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी पहिल्या मुद्यावर त्यांना माहिती प्राप्त झालेली आहे. तथापि दुसऱ्या मुद्याबाबतची अप्राप्त आहे. या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली आढळून येत नाही. यास्तव प्रकरण पोलीस अधीक्षक, लातूर कार्यालयाकडे परत पाठविण्यात येत आहे. या प्रकरणासाठी नेमलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर कायदा व सुव्यवस्थेच्या गरजा विचारात घेऊन प्रथम अपिलावर अर्जदाराने मागितलेल्या मुद्दा क्र.२ च्या माहितीबाबत निर्णय घ्यावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर अपील बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सौदागर म.रफि पाशामियॉ,रा.वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपीलकर्ता
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
दुय्यम निबंधक वर्ग-१,
अहमदपूर, जि. लातूर.

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.),
लातूर तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - दुय्यम निबंधक वर्ग-१, अहमदपूर,जि.लातूर - (१) श्री. जी.एस.कावळे (सध्याचे) (२) डी.यु. चव्हाण (तत्कालीन) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.) लातूर तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-१०-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०१-२००९ (फेरसादर- ०२-१२-२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दि. २२.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेली आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने दि. ०६.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर दि. २९.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ लातूर यांनी सुनावणी घेऊन दि. २९.११.२००८ रोजी निर्णय दिला आहे.

आयोगाच्या नजरेस असे आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलावर अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या दोनही मुद्यांशी संबंधित नियमाचा सविस्तर उहापोह केलेला आहे व शेवटी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले असून निकाली काढण्यात आले आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या प्रथम अपिलामधील निर्णय कायम ठेवून द्वितीय अपील खारीज करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड,'श्री मावूली' दत्त मंदिराच्या मागे, जुन औसा रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक,वर्ग-१, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कैलास बच्चू मस्के,<br>रा.बाभुळगाव, ता.जि.लातूर. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, तुकाराम नाईक प्रा.वि.उदगीर,<br>जि.लातूर. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, तुकाराम नाईक प्राथमिक विद्यालय, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.) जि.प.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांपैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, तुकाराम नाईक प्राथमिक विद्यालय,उदगीर यांनी अपिलार्थी यांना मागितलेली माहिती दि. २८.०७.२०१० रोजी प्रत्यक्षात दिली आहे. याबाबत अपिलार्थी यांनी मुख्याध्यापक यांना त्यांच्या मागणीप्रमाणे माहिती दि. २८.०७.२०१० रोजी दिली असल्याची दि. २८.०७.२०१० रोजी पोच दिली असून सदरील प्रकरण खारीज करण्यास अपिलार्थीची काहीच हरकत नाही, अशी त्यांनी नोंद केली आहे. आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नसल्यामुळे दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापि अपिलार्थीने दिलेली पोच लक्षात घेता प्रकरण खारीज करण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. द्वितीय अपील खारीज करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास बच्चु मस्के, मु.पो.बाभळगाव, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, तुकाराम नाईक प्राथमिक विद्यालय,जळकोट रोड,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती टाळकुटे इंदुबाई भ्र. कानबा, : अपीलकर्ता
रा. कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पोलीस प्रमुख, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड - प्रतिनिधी - श्री. योगेश अशोकराव गावंडे, पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण, नांदेड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड - प्रतिनिधी - श्री. योगेश अशोकराव गावंडे, पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ३०-०७-२००९ रोजी जन माहिती अधिका-यामार्फत पुरविण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०९-०९-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व तसेच अपिलार्थी यांनी माहूर पोलीस स्टेशन येथे जबाब दिला आहे व त्यावर त्यांचा अंगठा आहे. प्रथम अपिलामध्ये तथ्य आढळून आले नसल्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-याने अपील अर्ज निकाली काढला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची काही आवश्यकता वाटत नाही. या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती टाळकुटे इंदुबाई भ्र. कानबा, रा. कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहम्मद अन्वरउल्ला खान, : अपीलकर्ता
९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, नरसिंह विद्या मंदिर, महावीर सोसायटी,
नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहम्मद अन्वरउल्ला खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नरसिंह विद्या मंदिर, महावीर सोसायटी, नांदेड - श्री. चौधरी सी. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक १८-०४-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. तथापि अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही तसेच माहितीचा अर्ज घेण्यासही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नरसिंह विद्या मंदिर, महावीर सोसायटी, नांदेड यांनी टाळाटाळ केली म्हणून त्यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे अर्ज पाठविला तो सुध्दा अपिलार्थीस परत आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे व त्याचा एक संच आज रोजी त्यांच्याकडे आहे. आयोगाने आदेशित केले की, तो संच जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस द्यावा. आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी तो संच आयोगासमोर अपिलार्थीस दिला. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती अर्जांवर कार्यवाही होईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद अन्वरउल्ला खान, ९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नरसिंह विद्या मंदिर, महावीर सोसायटी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मलंग अब्दुल रहमान पि.मो.इस्माईल,<br>रा.उदगीर, जि.लातूर. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग, क्र.१,नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प क्र.१, नांदेड-प्रतिनिधी- श्री. के. टी. भानेगावकर,शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड - प्रतिनिधी - श्री. एस.एस.हाश्मी, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-११-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच सहायक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. २७.१०.२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे.या माहितीमधील मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भात अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे नांदेड यांचे पत्र दि. १३.०६.२००९ रोजीचे पत्रान्वये जी चौकशीची कार्यवाही झाली, त्याची सत्यप्रत देण्यात आली आहे व मुद्दा क्र. २ च्या संदर्भात दि. १५.०९.२००९ च्या चौकशीची प्रत दिली आहे.अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती उशिरा प्राप्त झाली आहे, असे त्यांनी द्वितीय अपिलामध्ये नमूद केले आहे. भविष्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविणेबाबत दक्ष राहणेकरिता आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०४-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान पि.मो.इस्माईल,रा.दबीरपूरा,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प क्र.१, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक मनोहरराव तेरकर,<br>रा. रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| २ | श्री. अनुरथ हणमंतराव बस्तापुरे,<br>रा. रेणापूर, तालुका रेणापूर जिल्हा लातूर | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, रेणापूर,<br>तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रेणापूर, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक मनोहरराव तेरकर | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी - श्री. अनुरथ हणमंतराव बस्तापुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर<br>- श्री. माने एन. पी. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर<br>- श्री. पुट्टेवाड एस. जी. | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - श्री. सुभाष लिम्मनअप्पा हलकुडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २७-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना यापूर्वीच देण्यात आलेली आहे. तथापि त्यांनी नुकताच दोन महिन्यापूर्वी कार्यभार स्विकारला असल्यामुळे आज रोजी सुधारीत माहिती पुन्हा घेऊन आले आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, प्रथम अपिलीय अधिका-याने त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन त्यावेळी त्यांना माहिती देण्यात आली होती परंतु ही माहिती चुकीची / दिशाभूल करणारी आहे असे आढळून आले. यास्तव आयोगाने आज असे सूचित केले की, सुधारीत माहिती जी जन माहिती अधिका-याने आणली आहे ती अपिलार्थीने घ्यावी व त्याचा अभ्यास करावा आणि त्यामध्ये चुकीची / दिशाभूल करणारी माहिती आढळून आल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे यासंदर्भात रितसर तक्रार दाखल करावी.

आयोगाच्या असे दृष्टोत्पत्तीस आले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर हे या पदावर दोन वर्षापासून कार्यरत आहेत व प्रथम अपिलावर त्यांनी निर्णय दिलेला आहे. असे असताना योग्य आणि बरोबर माहिती अपिलार्थीस एक वर्षाचा कालावधी ओलांडूनही मिळू शकत नाही ही बाब गंभीर आहे. याची दखल आयोगाने घेतली आहे. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर यांनी भविष्यात दक्ष राहणे आवश्यक आहे. अपिलार्थीने आज रोजी माहिती स्विकारली आहे. या माहितीमध्ये त्यांना काही त्रुटी आढळल्यास विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर यांनी यासाठी एक तारीख निश्चित करुन अपिलार्थीने उर्वरीत मागितलेली कागदपत्रे या माहितीसंदर्भात त्यांना दाखवावी व अपिलार्थीने मागणी केल्यास त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य द्याव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आज रोजी आयोगासमोर दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस काही माहिती अपूर्ण / चुकीची आढळून आल्यास योग्य व बरोबर माहितीची कागदपत्रे

दाखविण्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस एक तारीख सुनिश्चित करुन द्यावी व अपिलार्थीस कागदपत्रे दाखवावी व तसेच अपिलार्थीने मागणी केल्यास त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य द्याव्यात. ही प्रक्रिया जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक मनोहरराव तेरकर, रा. रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,<br>बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव,<br>रा. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - ॲडव्होकेट भरड संतोष रमाकांत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर<br>- श्री. कदम एम. एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००९ |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली व जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही गोलमाल स्वरुपाची असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणासंदर्भात महालेखापाल,नागपूर कार्यालयाकडून उपस्थित केलेल्या आक्षेपांची पूर्तता करुन त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या प्रस्तावाची पूर्तता जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठांच्याकडे पाठविला असल्यामुळे त्या प्रस्तावाची प्रत, अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे रजिस्टर्ड पाकीट स्वीकारले नाही त्यामुळे अपिलार्थीने दि. १०.०९.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाला सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. ०५.१०.२००९ रोजी माहिती दिली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.०७.२०१० रोजी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते व जन अपिलीय अनुपस्थित होते. त्यानंतर दिनांक १९-११-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वकील व्ही. यु. जाधव उपस्थित होते व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थीच्या वकिलाच्या विनंतीनुसार सदर सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात आली. त्या अनुषंगाने प्रकरणात आज दिनांक ०५-०१-२०११ रोजी पुनश्च सुनावणी घेण्यात आली.

दिनांक ०७-०७-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन त्यांचा आक्षेप, मुख्याध्यापकाने अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतन प्रकरणासंदर्भात महालेखापाल,नागपूर यांच्या कार्यालयाने उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या पूर्ततेवरील आहे. अपिलार्थीच्या मते महालेखापाल,नागपूर यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची पूर्तता मुख्याध्यापकाने बरोबर केली नसून ही पूर्तता करताना मुख्याध्यापकाने त्यांच्या वेतनवाढीची तारीख चुकीची दर्शविली आहे. त्यामुळे मुख्याध्यापकाने दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दिनांक ०७-०७-२०१० रोजी संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहून आयोगाने असे अभिप्राय

व्यक्त केले होते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांनी निर्णय दिल्यानंतर दि. ०५.१०.००९ रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध होती, त्या स्वरुपात पुरविलेली आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते या प्रकरणाकडे पहावयाचे झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. अपिलार्थीचा मूळ आक्षेप त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणात महालेखापाल,नागपूर यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या संदर्भात मुख्याध्यापकाने चुकीच्या पध्दतीने केलेल्या पूर्तता अहवालाशी संबंधित आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना जर मुख्याध्यापकाने त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणासंदर्भात चुकीच्या पध्दतीने आक्षेप पूर्तता केली आहे असे वाटत असेल तर, त्यांनी त्यांच्या या गाऱ्हाण्याची तड शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर, यांच्याकडून परस्पर लावून घ्यावी. अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती प्रकरणामध्ये मुख्याध्यापकांना प्रशासकीय स्वरुपाचे आदेश देण्याची अधिकारिता आयोगास नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. ०५.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीच्या अपिलासंदर्भातील सर्व मुद्दे निकाली निघत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे रजिस्टर्ड टपालाचे पाकीट मुख्याध्यापकाने स्वीकारले नसल्याचा सबळ पुरावा आयोगास सादर केला असून यासंदर्भात मुख्याध्यापक,भगतसिंग विद्यालय,पळशी,ता.रेणापूर, जि.लातूर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन, इत:पर माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्याकडे प्राप्त होणारा प्रत्येक अर्ज स्वीकृत केला जाईल, याची त्यांनी दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲड. भरड संतोष रमाकांत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

मागील सुनावणीच्या वेळेस अपिलार्थीतर्फे ॲडव्होकेट व्ही. यु. जाधव उपस्थित होते. आज रोजी ॲड. भरड संतोष रमाकांत उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०६-१०-२००९ रोजी पुरविली आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०९-२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०-०९-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय घेतला की, अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती दोन आठवड्यात देण्यात यावी. आज रोजी जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा एक संच त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे

आयोगास सांगितले. हा माहितीचा संच अपिलार्थीच्या वकिलांनी घ्यावा असे आयोगाने निदेश दिले. त्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या वकिलांनी माहिती ताब्यात घेतली. या माहितीचा त्यांनी अभ्यास करावा व त्यामध्ये माहिती अपुरी आहे असे त्यांना आढळून आल्यास जन माहिती अधिकारी यांना कळवावे व उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यानी अपिलार्थीस पहाणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी आणि यावरही अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वराट विश्वंभर सोनाजीराव, रा. भोकरंबा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भगतसिंग विद्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोनी श्रीनिवास मदनलाल, : अपीलकर्ता
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, देवणी,जि.लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोनी श्रीनिवास मदनलाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर- श्री. नितीन शेषराव दाताळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर-प्रतिनिधी-श्री. डी.एस.स्वामी, अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष -श्री. मिलींद मच्छिंद्र कांबळे,श्री. मच्छिंद्र नरसिंग कांबळे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगापुढे सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दि. ०७.१०.२००९ रोजी पाठविण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा दि. ०१.१२.२००९ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली होती. तथापि अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्यावेळी सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज या माहितीचा एक संच उपलब्ध आहे.आयोगाच्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये या माहितीचा संच (एकूण ६३ पृष्ठे) अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित केला. अपिलार्थीने या कागदपत्रांची पहाणी करावी व त्यामध्ये मूळ अर्जाशी संबंधित माहितीमध्ये त्यांना काही अपूर्ण/चूकीची कागदपत्रे वाटत असतील तर ते पुढील कार्यवाही करु शकतात. जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचा विलंब यापुढे होणार नाही, याची भविष्यात दक्षता घेणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनी श्रीनिवास मदनलाल, बालकृष्ण ऑटोमोबाईल्स, उमा चौक, उदगीर, जि.लातूर - ४१३५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांढरे बाबुराव ईरप्पा, : अपीलकर्ता
रा. पारकट्टी गल्ली, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा,
तालुका निलंगा, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. एस. एस. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सं. गो. मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची आणि तसेच तिची व्याप्ती सुध्दा फार मोठ्या प्रमाणावर होती. अपिलार्थीस मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व फारच जुनी असल्यामुळे एकत्रित करण्यासाठी वेळ लागेल असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे त्यांना दिनांक २३-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये दिनांक २६-०७-२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून प्रत्यक्ष माहितीची पाहणी करण्यासाठी कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००९ रोजी निर्णय दिला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती पाहण्याची संधी देण्यात आली होती ही बाब विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांढरे बाबुराव ईरप्पा, रा. पारकट्टी गल्ली, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाबु हाणमंतराव खंदाडे,<br>व्दारा- तिरुपती ॲग्रो एजन्सी, २०, शाहु मार्केट,<br>लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सह दुय्यम निबंधक कार्यालय, लातूर - २ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि. श्रे.), प्रशासकीय इमारत,<br>लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर - २ - श्री. अशोक रामलिंग मोहिते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ (नि. श्रे.), लातूर - श्री. एन. बी. विभुते | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. एन. एन. काझी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर - २ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. पूर्वीचे व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०९-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०६-१०-२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-११-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थी यांचे आयोगास लिहिलेले दिनांक ०२-०८-२०१० रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर क्रमांक २ यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय त्यांना मान्य आहे. त्यामुळे सदरचे व्दितीय अपील खारीज करण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबु हाणमंतराव खंदाडे, व्दारा- तिरुपती ॲग्रो एजन्सी, २०, शाहु मार्केट, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर - २ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ (नि. श्रे.), लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनंत गोविंदराव पारसेवार,<br>गोविंदराज प्रिटींग प्रेस, रेल्वेस्टेशन जवळ, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा,<br>तालुका निलंगा, जिल्हा लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनंत गोविंदराव पारसेवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर - श्री. एस. एस. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर - श्री. सं. गो. मुनगिलवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-११-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २९-०७-२०१० रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे व अपिलार्थीने ही माहिती मिळाल्याचे आयोगासमोर मान्य केले आहे.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक ०५-०८-२००९ रोजीचा आहे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २९-०७-२०१० रोजी माहिती मोठ्या विलंबाने देण्यात आली आहे. भविष्यात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती देण्याची दक्षता जन माहिती अधिकारी यांना घ्यावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिटींग प्रेस, रेल्वेस्टेशन जवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पठाण मासुमखान इस्माईलखान,<br>रा. आयेशा कॉलनी, लातूर | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर - श्री. विलास जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर - प्रतिनिधी - श्री. स्वामी डी. एन. अधीक्षक, साप्रवि, जिल्हा परिषद, लातूर | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मुख्याध्यापक, कृपासदन इंग्लीश स्कूल, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जातील माहितीकरिता अपील अर्जाची एक प्रत राज्य माहिती आयोग, मुंबई खंडपीठाकडे व्दितीय अपिलासाठी सादर केली होती. त्यांचा राज्य माहिती आयोग, मुंबई खंडपीठाकडील अपील क्रमांक २००९/५३१०/०३ असा आहे आणि त्यावर राज्य माहिती आयोग, मुंबई खंडपीठाने दिनांक २३-०९-२०१० रोजी निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या अपील अर्जावर विचार करण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठास कळविले आहे की, राज्य माहिती आयोग, मुंबई खंडपीठाने त्यांचे अपील मान्य केलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीच्या या अपिलाची सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही या पार्श्वभूमीवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पठाण मासुमखान इस्माईलखान, रा. आयेशा कॉलनी, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख असलम आल्लाबक्ष,<br>लातूर. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>परीक्षा नियंत्रक,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>परीक्षा विभाग,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- शेख असलम आल्लाबक्ष | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - श्री.एस.एम.हंबर्डे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - डॉ. व्ही. के. भोसले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगापुढे सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या परीक्षा क्र.ZA ४१९८९ च्या गुणपत्रिकेत Result M.P. दाखविल्याबाबतच्या प्रकरणाची संपूर्ण माहिती मागविली होती. तसेच प्रकरणात त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती मागितल्या होत्या. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०९.२००९ रोजी कळविलेले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१०.२००९ रोजी निर्णय दिला असून अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती/मागणी केलेले दस्तऐवज देता येत नाही, असा निर्णय घेऊन अपील फेटाळले आहे. उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत देऊ नये, याबाबत राज्य माहिती आयोग तसेच केंद्रीय माहिती आयोगाने वेळोवेळी निर्णय घेतलेला आहे व या प्रकरणामध्ये प्रत्यक्षात उत्तरपत्रिकेच्या संदर्भात अपिलार्थीच्या गुणपत्रिकेवर एम.पी. शेरा दाखविल्यामुळे ती कागदपत्रेसुध्दा देय होणार नाहीत, असे आयोगाचे मत आहे. यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(छ) अन्वये माहिती देता येत नाही, असा जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख असलम अल्लाबक्ष,द्वारा शेख पाशाभाई ड्रायव्हर, चौधरी नगर, मस्जीदजवळ,एच.पी.उर्दू स्कुल समोर, बार्शी रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संगमेश्वर बी. मसलगे,<br>रा.उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, देवणी,जि.लातूर. | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर. | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- प्रतिनिधी - श्री.सतीश धूत,सदस्य, मानव अधिकार संघटना | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर- श्री. नितीन शेषराव दाताळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर-प्रतिनिधी-श्री. डी.एस.स्वामी, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दोन मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील चौकशी प्रक्रिया त्यावेळी प्रगतीपथावर होती. ती चौकशी पूर्ण झाल्यावर आता दि. १५.१२.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.तसेच उर्वरित माहितीबाबत अपिलार्थीस दि. ०७.१०.२००९ रोजी प्रथमतः कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थीने सुनावणीमध्ये असे सांगितले की, त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी ही बाब संबंधित पोस्ट ऑफीसकडे चौकशी करण्याकरिता कळवावी.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज या माहितीचा एक संच उपलब्ध आहे.आयोगाच्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये या माहितीचा संच अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित केला. अपिलार्थीने या कागदपत्रांची पहाणी करावी व त्यामध्ये मूळ अर्जाशी संबंधित माहितीमध्ये त्यांना काही अपूर्ण/चूकीची कागदपत्रे वाटत असतील तर ते पुढील कार्यवाही करु शकतात.त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अशाप्रकारचा विलंब भविष्यात होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संगमेश्वर बी. मसलगे,मानवाधिकार संघटन, द्वारा बालकृष्ण ऑटोमोबाईल्स, उमा चौक, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. यशवंत केशवराव आचार्य, : अपीलकर्ता
रा.बेलगाव, ता.चाकूर, जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
जन अपिलीय अधिकारी, :
परीक्षा विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१९ | | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. | ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | | |
| ३.१ | अपिलार्थी- | : | अनुपस्थित | |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - श्री.एस.एम.हंबर्डे | : | उपस्थित | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - डॉ. व्ही. के. भोसले | : | उपस्थित | |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - प्राचार्य, राजीव गांधी तंत्र महाविद्यालय,चाकूर | : | अनुपस्थित | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. | २७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. | ०५-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. | ११-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. | ०५-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. | ०४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगापुढे सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे सन २००८-०९ मध्ये झालेल्या बी.एस्सी प्रथम वर्ष द्वितीय सेमीस्टरच्या परीक्षेच्या राजीव गांधी विद्यालय, चाकूर,जि.लातूर येथून बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेच्या व गुणपत्रिकेच्या प्रती मागितल्या आहेत. ती कागदपत्रे त्यांना दि. ०५.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये नाकारण्यात आली आहेत.हीच बाब प्रथम अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांनी त्यांच्याकडील दि. ०५.१०.२००९ रोजीच्या प्रथम अपीलावरील निर्णयामध्ये कायम करुन अपील फेटाळले आहे. परीक्षेच्या उत्तरपत्रिका देय नाहीत, यावर वेळोवेळी राज्य माहिती आयोग व केंद्रीय माहिती आयोगाने निर्णय दिलेला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यशवंत केशवराव आचार्य, रा.बेलगाव,पो.सताळा,ता,चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सदाकाळे शंकर एकनाथ, : अपीलकर्ता
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षण विभाग, जि.प.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, लातूर.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -प्रतिनिधी- श्री. संजय शंकर सदाकाळे | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.लातूर- श्री. वि.का.जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर-प्रतिनिधी-श्री. डी.एस.स्वामी, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (मुलगा), जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगापुढे सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती दि. १५.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविण्यात आली होती. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले. आज सुनावणीच्यावेळी आयोगाचे सूचनेनुसार सदर पत्राची एक छायांकित प्रत अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीकडे हस्तांतरित करण्यात आली व यासंदर्भात अधिकची माहिती अपिलार्थीस अपेक्षित असल्याचे आयोगास दिसून आले. त्याबाबत अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करु शकतात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सदाकाळे शंकर एकनाथ,सेवानिवृत्त शिक्षक, 'शिवसदन',माताजी नगर,बसवेश्वर चौक, कव्वा रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बोधले गणेश शिवाजीराव, : अपीलकर्ता
रा.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई.

जन अपिलीय अधिकारी तथा :
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -१) सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई-१- श्री. एस.पी.न्यायनित<br>२)निरिक्षक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद - श्री. सी.एस.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, म.रा.मुंबई-१ - श्री. पी.एस.जयस्वाल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-१२-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगापुढे सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २३.११.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे.प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्याचे आढळून आले नाही. यासंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झालेला नाही. अपिलार्थी हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औसा, जि.लातूर येथे शिल्पनिदेशक या पदावर कार्यरत आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जात हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप - 'बदली प्रवासभत्ता/बदल/रद्द माहिती अंमलबजावणी न केल्यामुळे नुकसान फसवणूक' असा मोघम उल्लेख केल्याचे दिसून येत असून, त्यांना कोणती माहिती हवी आहे, हे सुस्पष्ट होत नाही,

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहे.त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बोधले गणेश शिवाजीराव, शिल्प निदेशक, आय.टी.आय. औसा, एम.आय.डी.सी. विभाग,औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा निरिक्षक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, म.रा.मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबु हाणमंतराव खंदाडे, : अपीलकर्ता
व्दारा- तिरुपती ॲग्रो एजन्सी, २०, शाहु मार्केट, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सह दुय्यम निबंधक कार्यालय, लातूर - १
जन अपिलीय अधिकारी तथा :
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि. श्रे.), प्रशासकीय इमारत, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८२२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर - १ - श्री. एन. एन. काझी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ (नि. श्रे.), लातूर - श्री. एन. बी. विभुते | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०९-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०६-१०-२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-११-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थी यांचे आयोगास लिहिलेले दिनांक ०२-०८-२०१० रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर क्रमांक १ यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय त्यांना मान्य आहे. त्यामुळे सदरचे व्दितीय अपील खारीज करण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबु हाणमंतराव खंदाडे, व्दारा- तिरुपती ॲग्रो एजन्सी, २०, शाहु मार्केट, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, लातूर - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ (नि. श्रे.), लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हारसिंग कोंडिराम गुसिंगे, : अपीलकर्ता
रा. शेवगा, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद - श्री. मुलचंद पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. के. पी. विसपुते | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०६-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-११-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ३०-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देतील असे ठरले होते. यानंतर दिनांक १५-११-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. अपिलार्थी उपस्थित होते. त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आज रोजी या प्रकरणी अंतिम सुनावणी घेण्यात आली. या वेळी आयोगास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवरुन तसेच आयोगापुढे असलेल्या कागदपत्रावरुन खालील वस्तुस्थिती आयोगाच्या नजरेस आली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-१२-२००० व दिनांक १८-१२-२००० रोजी दिलेल्या निकाला-वरुन जावक क्रमांक २०००/जमा/२/सीआर/२८/फेरफार क्रमांक ८५३ साठी दिलेल्या आदेशाची माहिती, अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणत्या गावाशी आणि त्यातील कोणत्या गटाशी संबंधित आहे याचे स्पष्टीकरण अपिलार्थीकडून मागविले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी दिनांक १५-०६-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जो अर्ज दिला आहे त्यामध्ये जन माहिती अधिका-याने त्यांना विचारलेल्या माहितीचा समावेश असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०९-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे यासंदर्भात दिनांक १४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांना या प्रकरणाशी संबंधित संचिका दाखवून त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो दिनांक १९-१२-२००० रोजी दिलेल्या आदेशाची माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगास अवगत केले व तसेच या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन तहसीलदार यांनी खाडाखोड करुन अपिलार्थीस आर्थिक झळ पोहोचवली असे आयोगास अवगत केले व तसेच ही माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला होता की, त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक १९-१२-२००० रोजी कोणताही आदेश निर्गमीत केला गेलेला नाही. तथापि अपिलार्थीस नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १८-१२-२००० रोजी दिलेल्या आदेशाची प्रत त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या पत्राने विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले होते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जी माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे आणि ही माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने कबूल केले आहे. दिनांक १९-१२-२००० रोजी ८५३ च्या फेरफारासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत केलेले नाहीत असे त्यांच्या प्रतिनिधीने आज युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. तथापि ही वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या पत्रामध्ये स्पष्ट केली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १९-१२-२००० रोजी दिलेल्या कथित आदेशाची वस्तुस्थिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगास निदर्शनास आणले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या अर्जामधील त्रुटी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लागलीच दिनांक २६-०६-२००८ रोजी कळविली आहे. तथापि या त्रुटीची पुर्तता करण्याऐवजी अपिलार्थीने केलेल्या त्यांच्या दिनांक १५-०६-२००६ रोजीच्या अर्जाचा संदर्भ जन माहिती अधिकारी यांना दिला आहे. यावरुन अपिलार्थीस खरोखरच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीची आवश्यकता होती किंवा कसे याचा आयोगास संभ्रम होत आहे . ज्या प्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास विहित मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे, तसेच अर्जदाराचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना ती स्पष्ट स्वरुपात मागितली जाईल असे पाहणे हे देखील त्यांचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशा प्रकारचे कर्तव्य योग्य रीतीने पार पाडल्याचे आयोगास आढळून येत नाही. वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दिनांक १९-१२-२००० रोजीच्या

आदेशासंदर्भातील वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कोणतीही नवीन बाब आली नाही त्यामुळे दिनांक ३०-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी काढलेले निष्कर्ष विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १९-१२-२००० रोजी दिलेल्या कथित आदेशाची वस्तुस्थिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हारसिंग कोंडिराम गुसिंगे, रा. शेवगा, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद विकारोद्दीन, : अपीलकर्ता
व्दारा राणा ॲटो पार्टस, उद्यान रोड, बस स्टॅण्ड जवळ, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/८८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद विकारोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. सोनवणे जी. डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. के. पी. विसपुते, सहायक माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी राज्य माहिती आयोगाच्या या खंडपीठापुढे दिनांक ३१-०५-२०१० रोजी या व्दितीय अपिलाची सुनावणी झाली होती. ही सुनावणी पुढे ढकलण्याची अपिलार्थीने विनंती केल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. दुस-यांदा या अपिलाची सुनावणी दिनांक ०३-१२-२०१० रोजी घेण्यात आली. या

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नव्हते. या प्रकरणात माहिती देण्याकरिता सुमारे दोन वर्षाचा कालावधी लागला आहे याची गंभीर दखल या सुनावणीच्या वेळी आयोगाने घेतली. माहिती का देण्यात आली नाही याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे याकरिता या अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व पुढील सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी, सध्याचे जन माहिती अधिकारी व तहसीलदार, पैठण यांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक राहील असा निर्णय घेऊन अंतरीम आदेश दिले होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजी माहितीसाठीचा अर्ज दिला होता. त्यास जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण यांनी प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २६-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी निर्णय देऊन त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत देण्यात यावी व माहिती देण्यासाठी विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी तहसीलदार, पैठण यांची राहील असा निर्णय घेतला होता. आजमितीपर्यंत अपिलार्थीस ही माहिती मिळाली नाही ही बाब उप विभागीय अधिकारी तथा तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुध्दा आज रोजी कबूल केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व माहितीनिशी व पुराव्यानिशी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व तहसीलदार, पैठण यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. तथापि आज रोजी ते उपस्थित नाहीत किंवा त्यांचे कोणी प्रतिनिधीही पाठविण्यात आलेले नाहीत. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-१२-२०१० च्या पत्रामध्ये तहसीलदार, पैठण यांना स्पष्ट आदेशित केले आहे की, दिनांक ०६-०१-२०११ रोजी सकाळी ११-०० वाजता राज्य माहिती आयोगासमोर होणा-या या व्दितीय अपिलाच्या सुनावणीसाठी उपस्थित राहावे त्याचप्रमाणे दिनांक ०३-१२-२०१० रोजी अनुपस्थित राहिल्याबद्दल स्पष्टीकरणही मागितले आहे. ही बाब विचारात घेता तहसीलदार, पैठण यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे तसेच वेळोवेळी सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे तसेच आज सुनावणीसाठी त्यांचा कोणी प्रतिनिधीही न पाठविल्यामुळे त्यांच्या हातून शासकीय कर्तव्य बजावताना प्रमाद घडला आहे आणि यास्तव ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र ठरत आहेत. प्रधान सचिव, महसूल यांनी संबंधित तहसीलदार, पैठण तसेच या प्रकरणाशी संबधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही आदेशित करावी अशी शिफारस करणे आवश्यक ठरत आहे. त्याचप्रमाणे दिनांक १२-०१-२००९ ते आज दिनांक ०६-०१-२०११ पर्यंत खालील जन माहिती अधिकारी कार्यरत होते त्यांनी कर्तव्यात कसूर केल्याबाबत रुपये २५००० इतकी शास्ती लावणे क्रमप्राप्त झाले आहे.

१. श्री. केशव नेटके, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण (दिनांक १२-०१-२००९ ते दिनांक १५-०५-२०१० पर्यंत)

२. श्रीमती वंदना गेवराईकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण (दिनांक १५-०५-२०१० ते आज पर्यंत)

३. श्री. सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण (दिनांक ०८-०६-२०१० ते आजपर्यंत)

सुनावणी सुरु असताना जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण श्री. सोनवणे उपस्थित झाले. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण हे अपिलार्थीस माहिती दिली किंवा कसे याचा खुलासा आयोगास करु शकले नाहीत ही बाब अजूनही गंभीर झाली आहे. प्रधान सचिव, महसूल यांनी यात व्यक्तिशः लक्ष घालणे आवश्यक ठरले आहे. अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण यांनी अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. त्याचप्रमाणे आजमिती-पर्यंत माहिती देऊ शकले नाहीत. त्यामुळे ते सामुहिकरित्या रुपये २५००० इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत. याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत हीच कारणे दाखवा नोटीस समजून जिल्हाधिकारी, औरंगाबाद मार्फत सादर करावा.

३. प्रधान सचिव, महसूल, मुंबई यांना या प्रकरणात वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद विकारोद्दीन, व्दारा राणा ॲटो पार्टस, उद्यान रोड, बस स्टॅण्ड जवळ, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. प्रधान सचिव, महसूल, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शामराव नारायणराव नागरगोजे,<br>रा. बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी,<br>सजा थेरला, ता. पाटोदा, जि.बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी सजा थेरला, ता.पाटोदा,जि.बीड- श्री. बांगर आर.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, पाटोदा,जि.बीड - श्री. आर.एम.जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १५.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीपोटी भरलेले शुल्क रु.१२९९/- इतके त्यांना तत्कालीन तलाठी श्री.एल.एन.पवार यांनी परत केले आहेत. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली इतर मुद्यांवरील माहितीबाबत शहानिशा करता आली नाही. तरी जन माहिती अधिकारी तथा सध्याचे तलाठी सजा थेरला यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना यापूर्वी दिली नसल्यास नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवून द्यावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना यापूर्वी दिली नसल्यास, या माहितीच्या प्रमाणित छायांकित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. शामराव नारायणराव नागरगोजे, रा. यशवंतराव चव्हाण नाटयगृहाजवळ, म्यु.घर नं. १-२-१७०, आनंदनगर कॅनॉल रोड (द.) बीड - ४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा थेरला, ता.पाटोदा, जि.बीड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विठ्ठल किशनराव मोरे, : अपीलकर्ता
रा. कान्हेगाव, ता.पूर्णा,जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार (गौण ख.),
पूर्णा, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -तहसीलदार (गौण ख.),पूर्णा, जि.परभणी - श्री. मुपडे भाऊराव संभाजी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०५-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २२.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी

कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगास अवगत केले की, ते या पदावर माहे जून, २०१० मध्ये रुजू झाले. सदरील प्रकरणाची संचिका ज्या कर्मचाऱ्याच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे, ते कर्मचारी कौटुंबिक अपरिहार्य कामामुळे अनुपस्थित असल्यामुळे ते आयोगासमोर कोणतीही कागदपत्रे सादर करु शकत नाहीत. अपिलार्थी आज सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांना माहिती प्राप्त झाली किंवा कसे, याबाबत आयोगास कळू शकत नाही. तरी या प्रकरणाची संचिका हस्तगत करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापि दिली गेली नसल्यास तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अद्यापि दिली नसल्यास संपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल किशनराव मोरे, रा.कान्हेगाव, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (गौण खनिज), तहसील कार्यालय, पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख सादेख शेख वाहेद, : अपीलकर्ता
रा.केज, जि.बीड.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक, वेतन पथक (प्रा.),
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- शेख सादेख शेख वाहेद | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक, कामेल ऊर्दू प्राथमिक शाळा, परभणी - प्रतिनिधी- श्री. अब्दुल रज्जाक, नोडल ऑफीसर,कामेल एज्युकेशन सोसायटी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, परभणी- प्रतिनिधी- श्री.एस.पी.कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी (प्रा) | : उपस्थित |
| ३.४ | अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक (प्रा),जि.प.परभणी श्री.एम.एल.भातलवंडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०८-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-१०-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १६.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे. या प्रकरणात संबंधित शाळेचे मुख्याध्यापक जन माहिती अधिकारी होतात व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.प्रथम अपिलीय अधिकारी होतात.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अधीक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक, जिल्हा परिषद,परभणी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे संस्थेचे नोडल ऑफीसर श्री. अ.रज्जाक यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास असे सांगितले की, शाळेच्या कार्यालयामध्ये दि. ०९.१०.२००८ रोजी चोरी झाल्यामुळे कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ते याबाबतची माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत. ही बाब त्यांना अपिलार्थीस कळवावी लागेल. आयोगाने त्यांना अशा सूचना दिल्या की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी चोरी दिनांकापासून ते अपिलार्थीने मूळ अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची (दि०९.१०.२००८ ते दि. १६.०६.२००९) उपलब्ध माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात यावी. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी सुनावणीच्यावेळी त्यांच्याकडे या शाळेची कोणतीही वेतन देयके प्राप्त झालेली नाहीत, असे सांगितले, ही बाब खरी वाटत नाही. त्यांचे एक २५ टक्के वेतन देयक सन २००३-०४ मध्ये जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाले होते, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तपासावी व त्यासंदर्भाची माहिती अपिलार्थीस पुरवावी.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कामेल ऊर्दू प्राथमिक शाळा, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य अपिलार्थीस पाठवावी. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यात येईल याकरिता पाठपुरावा करावा व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस परस्पर द्यावी, ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख सादेख शेख वाहेद, फुलेनगर, केज, ता.केज, जि.बीउ

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कामेल ऊर्दू प्राथमिक शाळा, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल**

**झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विकासकुमार बागडी,<br>रा.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जालना - प्रतिनिधी श्री.सचिव बुवाजी फुले, कृषी पर्यवेक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, जालना - श्री. सी.के.बहुरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०१-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०१-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०९.१२.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. सुनावणीच्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणाची वस्तुस्थिती सादर करण्यासाठी सदर सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली होती. ती मान्य करुन आज दि. ०६.०१.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दि. १८.०२.२००९ रोजी टपालाद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी दि. १७.०३.२००९ रोजी तालुका कृषि अधिकारी, जालना यांना कळविले आहे की, त्यांना सदरची माहिती (एकूण पृष्ठ संख्या ३०) प्राप्त झाली आहे. आज रोजी आयोगापुढे अपिलार्थीचे दि. ०३.०१.२०११ चे पत्र सादर करण्यात आले. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे विचाराधीन द्वितीय अपील रद्द करण्यात यावे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी,नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. इलियास खान पिता अब्दुल मजीद खान,<br>रा.बदनापूर, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक कुलसचिव,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>परीक्षा नियंत्रक,<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री.इलियास खान पिता अब्दुल मजीद खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कुलसचिव (स्थापत्य),परीक्षा विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद- श्री. क-हाळे व्ही. एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - परीक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद- डॉ. अशोक एम.चव्हाण | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष -श्री. पठाण साजीद अब्दुल मजीद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-१२-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १०.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. त्यामुळे त्रयस्थ पक्ष श्री. पठाण साजीद अब्दुल मजीद, जे अपिलार्थीचे बंधू आहेत. त्यांचे तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणातील सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी  अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांना भारतीय राज्य घटनेप्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती मिळणे आवश्यक आहे. जन माहिती तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, विद्यापिठात याकरिता नियम सुनिश्चित केले असून विहित पध्दतीनुसार मुदतीत विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क भरल्यानंतर नियमानुसार संबंधित विद्यार्थ्यास स्वतःच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत देता येऊ शकते. तथापि अर्जदाराचा अर्ज विहित मुदतीत न आल्यामुळे त्यांना उत्तरपत्रिकेची प्रत देता आली नाही. विद्यार्थ्यांनी लिहिलेली उत्तरपत्रिका ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(ङ) नुसार, देय ठरत नाही. तसेच राज्य माहिती आयोग व केंद्रीय माहिती आयोगाने वेळोवेळी उत्तरपत्रिकांच्या प्रती देऊ नयेत असा निर्णय घेतला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्यानंतर दि. १४.०९.२००९ रोजी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इलियास खान पिता अब्दुल मजीद खान,रा.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (स्थापत्त्य), परीक्षा विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,<br>रा.जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,परतुर, जि.जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि.जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- सय्यद नदीम सय्यद फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि.जालना - श्री. माणिकराव कुंडलिकराव थेटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अध्यक्ष, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि.जालना - तर्फे- ॲड.एस.एस.देवगुडे | : | उपस्थित |
| ३.४ | सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद - डॉ.मोहंमद फैय्याज | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. सुसर (प्राध्यापक) | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-१२-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १४.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच सहसंचालक उच्च शिक्षण यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे वकील ॲड.एस.एस.देवगुडे, तसेच सहसंचालक, (उच्च शिक्षण),औरंगाबाद उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी या पदाचा दोन-तीन महिन्यापासून कार्यभार स्वीकारला आहे, ते अपिलार्थीस माहिती द्यावयास तयार आहेत. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे ॲड. देवगुडे उपस्थित आहेत. त्यांनी ही बाब मान्य केली व जन माहिती अधिकारी त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व माहिती पुरवतील.अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांना आता इतक्या कालावधीनंतर दि. ३०.१२.२०१० रोजीच्या पत्राने प्रतिपृष्ठ रु.२/- याप्रमाणे शुल्क भरण्याचे कळविले आहे. माहिती विहित मुदतीत पुरविली नसल्यामुळे आता सर्व माहितीच्या प्रमाणित साक्षांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. आज रोजी सहसंचालक (उ.शि.) औरंगाबाद हे सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे सांगितले की, या महाविद्यालयास शासनाचे अनुदान आहे, त्यामुळे सदर महाविद्यालयास माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि.जालना यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीच्या प्रमाणित साक्षांकित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०११**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, लालबहादुर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितनवरे पुष्पानंद शंकरराव, : अपीलकर्ता

जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड प्रितमकुमार शेगांवकर यांच्या बंगल्याशेजारी, लोहिया हॉस्पिटलसमोर, क्रांतीनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. हिवाळे एस. डी. कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०३-१२-२०१० रोजी घेण्यात आली होती त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगास विनंती केली होती की, या प्रकरणातील तपशील आयोगापुढे सादर

करण्यासाठी काही कालावधी लागेल. त्यासाठी काही कालावधी देण्यात यावा. त्याप्रमाणे त्यांची विनंती मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आज रोजी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. हिवाळे एस. डी. उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी दिनांक २४-०६-२००९ रोजी अपिलार्थीस १०० रुपये इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे कळविण्यात आले होते व अपिलार्थीस दिनांक २४-०६-२००९ रोजी माहिती पुरविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे तालुका स्तरावरील माहिती तालुका स्तरावर संपर्क साधून घेण्याचे अपिलार्थीस कळविले आहे. कागदपत्रावरुन असे दिसते की, अपिलार्थीने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधला आहे.आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांना सर्व तालुका स्तरावरील अधिका-यांकडून माहिती मिळाली किंवा कसे हे आयोगास अवगत होत नाही. तथापि जिल्हा स्तरावरील माहिती अपिलार्थीस मिळाली आहे असे दिसून येत आहे व ही बाब जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास ज्ञात केली.

वरील पार्श्वभूमीवर या कार्यालयापुरते प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. तालुका स्तरावरील माहिती मिळाली नसल्यास ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत मिळेल असे जिल्हास्तरावरील अधिका-यांनी पहावे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितनवरे पुष्पानंद शंकरराव, जुन्या जिल्हा कोर्टामागे, राज्यमंत्री ॲड प्रितमकुमार शेगावर यांच्या बंगल्याशेजारी, लोहिया हॉस्पिटलसमोर, क्रांतीनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विठ्ठल बाबुराव एडके,<br>मु. पो. दावरवाडी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विठ्ठल बाबुराव एडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. सोनवणे जी. डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना माहिती मिळाली नाही. दिनांक ०३-१२-२०१० रोजी आयोगाने सुनावणी घेतली तेव्हाही हिच परिस्थिती होती त्यामुळे आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास विनंती केली की, ते अपिलार्थीस ही माहिती तात्काळ पुरवतील याकरिता त्यांना एक अंतिम संधी त्यांना देण्यात येत आहे.

आज रोजीच्या आयोगाकडील सुनावणीस उपस्थित होण्याकरिता तहसीलदार, पैठण यांना उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक २०-१२-२०१० च्या पत्राने कळविले आहे. तथापि कोणीही उपस्थित नाही. तहसीलदार, पैठण यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबतचे स्पष्टीकरण जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे मार्फत आयोगास सादर करणे आवश्यक राहील. अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. तहसीलदार, पैठण यांनी दिनांक ०३-१२-२०१० व दिनांक ०६-०१-२०१० रोजीच्या सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल तसेच अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न दिल्याबाबतचा खुलासा जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विठ्ठल बाबुराव एडके, मु. पो. दावरवाडी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुधाकर मोतीराम करोडे,<br>३२, राजीव गांधी नगर, महालक्ष्मी चौकाजवळ, मुकुंदवाडी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या प्रकरणात दिनांक ०७-१२-२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी हे कलावंत आहेत, त्यामुळे अपिलार्थी यांना देय असलेल्या माहितीबाबत दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटले. त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात

येऊन ती आज रोजी ठेवण्यात आलेली आहे. तथापि आज सुनावणीसाठी आयोगासमोर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-१०-२००९ रोजी पुरविली असल्याचे आयोगासमोर उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. त्याचप्रमाणे पुन्हा त्यांना दिनांक ०७-१२-२०१० रोजीच्या पत्राची प्रत देऊन कळविण्यात आले होते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस या प्रकरणाची सद्यस्थिती कळविली आहे. या प्रकरणाबाबत पुढे काही प्रगती झाली असल्यास तसे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ते कलावंत असल्यामुळे त्यांनी मागितलेल्या माहितीबाबतची सद्यस्थिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कळवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुधाकर मोतीराम करोडे, ३२, राजीव गांधी नगर, महालक्ष्मी चौकाजवळ, मुकूंदवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण सोनाजीराव घोडके,<br>रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, कार्यालय नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण सोनाजीराव घोडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, कार्यालय नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, कार्यालय नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच त्यांचे वकील उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत, याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

या प्रकरणाची दिनांक ०८-१२-२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचेपैकी कोणीही उपस्थित नव्हते त्यामुळे दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्याने सदर सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन आज दिनांक ०६-०१-२०११ रोजी ठेवण्यात आली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती दिलेली नाही तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २९-०८-२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिका-याय निर्देशित केले आहे.

अपिलार्थीतर्फे त्यांच्या वकिलाने आयोगास असे अवगत केले की, आजपर्यंत त्यांना ही माहिती प्राप्त झ ाालेली नाही व त्यांच्या पक्षकाराने माहिती आयोगाच्या आदेशाची प्रत जोडून नगर परिषद, पैठण यांच्याकडे दिनांक १६-१२-२०१० ला अर्ज केला होता त्यावरही नगर परिषदतर्फे कार्यवाही झालेली नाही. या सर्व बाबीमुळे मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे करावयाच्या शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरत आहेत. त्याचप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीने मागितलेली माहिती न देऊन ते शास्तीस पात्र ठरले आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदी गांभीर्यपूर्वक घेऊन त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व सरते शेवटी कार्यालय प्रमुखाची असते आणि या बाबीकडे नगर परिषद, पैठण यांच्याकडून दुर्लक्ष झाले आहे असे आयोगास आढळून येत आहे. यास्तव प्रधान सचिव, नगरविकास, मुंबई यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने व व्यक्तिशः पाहणे आवश्यक ठरले आहे व संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी जे या प्रकरणात अपिलार्थीचा अर्ज दाखल झाल्यापासून जबाबदार आहेत त्यांच्या हातून अपिलार्थीस माहिती न देण्याचा प्रमाद घडला आहे त्याबद्दल त्यांच्यावर रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगास सादर करावा.

३. या प्रकरणात माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीच्या अंमलबजावणीमध्ये कसूर केल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी, इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी तसेच नगर परिषदेचे मुख्याधिकारी शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र ठरत आहे अशा सर्व संबंधितांविरुध्द प्रधान सचिव,

नगरविकास, मुंबई यांनी शिस्तभंगविषयक कार्यवाही योजावी अशी आयोगाची शिफारस आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण सोनाजीराव घोडके, रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण दगडू माडूकर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक संचालक,<br>नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शहर अभियंता,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. अरुण दगडू माडूकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. अविनाश भा.देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री.डी.पी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.४ | आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद - डॉ. पुरुषोत्तम भापकर | : | उपस्थित |
| ३.५ | शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद-श्री. एम.डी.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ पक्ष - मे. अमृत डेव्हलपर्स | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०६-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २२-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०५-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-०९-२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०८.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तसेच आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात शुल्क रु.१९४/- इतके भरण्याचे त्यांच्या दि. २२.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविण्यात आले होते. यावर अपिलार्थीने आयोगास अवगत केले की, हे शुल्क त्यांना जास्त वाटल्यामुळे तसे त्यांनी दि. २७.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना कळवून लेखी स्वरुपात माहिती देण्याबाबत सूचित केले होते. तसेच अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यात आली नाही, त्यामुळे आता अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी लागेल. अपिलार्थी यांनी दि. २९.०६.२००९ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे माहितीच्या झेरॉक्स प्रती, नकाशाच्या प्रती, टिपणीच्या प्रती इ. (खुलासे/कारणे अथवा स्पष्टीकरणे वगळता) माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. सुनावणीमध्ये आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस माहिती पाठविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहितीच्या/नकाशाच्या/टिपणीच्या/नस्तीमधील पत्रव्यवहाराच्या प्रमाणित साक्षांकित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे

विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण दगडू माडुकर, फ्लॅट नं.ए-३, अमृत वैभव अपार्टमेंट, जालाननगर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन,<br>घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद<br>- श्री. अजीज अहेमद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद<br>- श्री. एस. एन. एम. कादरी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०२-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०२-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २०-०६-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५-०७-२००८ रोजीचे फेरसादर दिनांक ३०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, ते दिनांक १८-०८-२०१० पासून या पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी श्री. शेख जफर हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रकरण पाहून माहिती देतो असे आयोगास सांगितले, ही बाब गंभीर आहे. कारण दिनांक ०२-१२-२०१० रोजी या प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली होती आणि त्याची प्रत दिनांक १०-१२-२०१० रोजी पाठविण्यात आली होती. त्यानंतर प्रकरणात लक्ष घालून अपिलार्थीस माहिती देणे आवश्यक होते. तसेच या सुनावणीस पुर्ण तयारीनिशी Statement of facts सह उपस्थित रहाणे जन माहिती अधिकारी कडून अपेक्षित होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, त्यांना अजूनही माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थी यांनी आयोगास पुढे सांगितले की, दिनांक ०२-०७-२००८ रोजी उर्दूमध्ये एका कागदावर माहिती देण्यात आली आहे ती प्रमाणित (सर्टिफाईड) करुन द्यावी त्यांना मिळालेली माहिती ही चुकीची आहे व त्यांना योग्य माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती मिळाव्यात. हे प्रकरण दिनांक ०३-०४-२००८ पासून सुरु आहे आणि सुमारे तीन वर्षे प्रकरण चालू आहे. त्यामुळे वक्फ बोर्डाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. तसेच आयोगाच्या असे दृष्टोत्पत्तीस आणून देण्यात आले आहे की, माहिती चुकीची व उशीराने दिली आहे. तरी अपिलार्थीस परीपूर्ण योग्य अशी माहिती त्वरीत देण्यात यावी लागेल आणि या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाला आहे त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास सादर करावा लागेल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली अचूक व योग्य माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

२. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तीन वर्षापूर्वीची आहे. तरीही त्यांना आजपर्यंत अचूक व योग्य माहिती प्राप्त होऊ शकली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी (तत्कालीन व सध्याचे) यांच्याकडून हा प्रमाद घडला आहे. त्याकरिता त्यांच्यावर एकत्रित रुपये २५००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत हीच कारणे दाखवा नोटीस समजून सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाफर हुसेन कमाल पिता गुलाम हुसेन, घर नं. १-१४-९६, देवडी बाजार, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. श्री. शेख जफर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद)

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तारेख गुलाम मुस्तफा बाययुनूस,<br>व्दारा : डॉ. मझर मोईयोद्दीन, प्लॉट नं. ३, मौलाना आझाद हौसिंग सोसायटी, हिमायतबाग चौक, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>भूसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तारेख गुलाम मुस्तफा बाययुनूस त्यांचे वकिलासह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद - श्री. बी. बी. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०५-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०५-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००८<br>फेरसादर दिनांक<br>२९-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२-१२-२०१० रोजी झाली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. एन. रणदिवे यांनी प्रकरणात तारीख वाढवून मिळावी अशी आयोगास विनंती केली होती. त्यानुसार सुनावणी आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीच्या व संचिकेत उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती ते अपिलार्थीस त्वरीत देत आहेत. यावर अपिलार्थीच्या वकिलाने ही बाब त्यांना मान्य आहे असे आयोगास सांगितले. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या वकिलाने आयोगासमोर सांगितले की, सदर माहिती ही १९७२ सालातील आहे व अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेण्यास तयार आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीच्या व संचिकेत उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तारेख गुलाम मुस्तफा बाययुनूस, व्दारा : डॉ. मझर मोईयोद्दीन, प्लॉट नं. ३, मौलाना आझाद हौसिंग सोसायटी, हिमायतबाग चौक, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सिध्देश्वर बद्रिनाथ उबाळे,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्था.स्त.) उपविभाग घनसावंगी,<br>जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्था.स्त.) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी-श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अभियंता, ल.पा. (स्था.स्त.),उपविभाग,घनसावंगी, जि.जालना- श्री. बी.जी.पांचाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्त.) विभाग, जालना - श्री. बोरोळे एस.एम. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०५-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०७-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-१२-२००८ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १५.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.०१.२०११ रोजी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती कोणत्या कालावधीची आहे, याचा बोध होत नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये सदरची माहिती दि. ०१.०१.२००८ ते ३१.०३.२००८ या कालावधीची असल्याचे दिसून येत आहे.ही बाब आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मान्य केली. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, या कालावधीमध्ये अंदाजे ५० कामे चालू होती. या कामांची अंदाजे ३०० हजेरीपत्रके तयार झाली असतील व प्रत्येकी २० पृष्ठांप्रमाणे एकूण अंदाजे ६००० पृष्ठे होतील. अद्यापी अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल तसेच या झेरॉक्सकरिता येणारा खर्च जन माहिती अधिकारी यांनी स्वतः उचलणे आवश्यक आहे. सुनावणीमध्ये आयोगास असे अवगत करण्यात आले की, संदर्भिय अर्जाच्या कालावधीमध्ये दोन जन माहिती अधिकारी यांनी कार्यभार हाताळला आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीच्या प्रतींसाठी झेरॉक्सकरिता येणाऱ्या खर्चाची रक्कम संबंधित दोन जन माहिती अधिकाऱ्यांकडून यथायोग्य वसूल करुन घेण्याची दक्षता घ्यावी.याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या उपविभागामधील दि.०१.०१.२००८ ते ३१.०३.२००८ या कालावधीमध्ये झालेल्या कामाच्या हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस व्यक्तिशःव विनामूल्य हस्तांतरित होतील, असे पहावे.

२) अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास विनामूल्य माहिती पुरविण्यासाठी येणारा छायांकित प्रतींचा खर्च संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडून वसूल करावयाची कार्यवाही

कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, जालना यांनी वर नमूद केल्याप्रमाणे करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रिनाथ उबाळे,मु.पो.कांवदी गल्ली अंबड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्त.) उपविभाग घनसावंगी,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्त.) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नेमिचंद धरमचंद बाकलीवाल, : अपीलकर्ता

रा. पूरी, पो. सोलेगाव (व्हाया वाळूज), तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद<br>- श्री. ज्ञानदेव मुकणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०१-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०४-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या एकूण सहा मुद्दयांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ या मुद्दयावरची माहिती ०७

डिसेंबर २००७ रोजी अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. मुद्दा क्रमांक ५ व ६ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी तीनदा अनुपस्थित राहिले असे दिसून येत आहे व त्यांच्या गैरहजेरीत प्रथम अपिलीय अधिका-याने अपील निकाली काढण्याचा निर्णय घेतला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि त्यांना माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नेमिचंद धरमचंद बाकलीवाल, रा. पूरी, पो. सोलेगाव (व्हाया वाळूज), तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नामदेव पुंडलीक कोल्हे,<br>रा. राजे संभाजी कॉलनी, प्लॉ. नं. २५, २६, जळगांव रोड, पोस्ट हरसूल, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद - श्री. के. डी. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-०३-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२००८ फेरसादर दि. १३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीतील ज्या मुद्दयांवरील माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे देय आहे ती माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. त्याचप्रमाणे काही मुद्दयांवर न्यायीक खुलासे मागितले आहेत. अपिलार्थीने ज्या मुद्दयांवर खुलासेवजा, अस्पष्ट, व्यापक, संदिग्ध माहिती मागितली आहे तसेच न्यायनिवाडा प्रकरणात प्रश्नात्मक माहिती मागितली आहे. अशा प्रकरणी माहिती देय होत नाही असेही अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपील फेटाळले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगा-पुढे उपलब्ध असलेली कागदपत्रे इत्यादीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलीक कोल्हे, रा. राजे संभाजी कॉलनी, प्लॉ. नं. २५, २६, जळगांव रोड, पोस्ट हरसूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, | : | अपीलकर्ता |
| रा.औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,सोलापूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| सहायक धर्मादाय आयुक्त, | | |
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक,सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, सोलापूर -श्री. एम.डी. शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०१-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०३-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०५-२००९ (फेरसादर दि.१२.०१.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास रक्कम रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प लावलेला नव्हता, या कारणास्तव अपिलार्थीस त्यांचा अर्ज नस्तीबाध्द केल्याबाबत त्यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे व अर्जदाराने तिकीट लावून अर्ज पाठविल्यास त्यांना माहिती पुरविता येईल, असे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. आज रोजी त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देऊ शकतात व आज रोजी सदर माहिती त्यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केली. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पाठवावी लागेल. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अत:आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं.२५,२६, जळगाव रोड, पोस्ट हर्सूल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रंगनाथराव धोकटे,<br>रा.बाबरगाव, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री. पंचगल्ले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार,अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींमधील, माहे जानेवारी, २००४ ते नोव्हेंबर २००७ या कालावधीतील प्रत्येक वर्षाच्या मंजूर करण्यात आलेल्या वार्षिक वेतनवाढीच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याच्या कारणास्तव त्यांचे प्रथम अपील फेटाळले आहे.जन अपिलीय अधिकारी यांची कार्यवाही योग्य नाही.अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची किमान आणखी एक संधी देणे आवश्यक होते. तसेच अपिलाच्या गुणवत्तेनुसार अपिलासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे, भविष्यात ही बाब त्यांनी लक्षात ठेवावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली तसेच शाळापातळीवरील माहिती संकलीत करुन घेऊन ते अपिलार्थीस पुरवतील, असे आयोगास आश्वासित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, रा.बाबरगाव,पो. पेंडापूर व्हाया वाळूज, ता. गंगापूर,

जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रंगनाथराव धोकटे,<br>रा.बाबरगाव, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री.पंचगल्ले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद-प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधी काही माहिती मागितली आहे. याद्वारे त्यांनी माहे जुलै, १९९१ ते नोव्हेंबर २००७ या कालावधीतील वैद्यकीय खाजगी वा इतर कारणास्तव उपभोगलेल्या अर्जित,वैद्यकीय वा इतर प्रकारच्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयाने मंजूर केलेल्या रजांच्या मंजूरी आदेशाच्या,मान्यतेच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याच्या कारणास्तव त्यांचे प्रथम अपील फेटाळले आहे.जन अपिलीय अधिकारी यांची कार्यवाही योग्य नाही.अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची किमान आणखी एक संधी देणे आवश्यक होते. तसेच अपिलाच्या गुणवत्तेनुसार अपिलासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे, भविष्यात ही बाब त्यांनी लक्षात ठेवावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली तसेच शाळापातळीवरील माहिती संकलीत करुन घेऊन ते अपिलार्थीस पुरवतील, असे आयोगास आश्वासित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, रा.बाबरगाव,पो. पेंडापूर व्हाया वाळुज ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रंगनाथराव धोकटे,<br>रा.बाबरगाव, ता.गंगापूर,औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री.पंचगल्ले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद -प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार,अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०३-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींमधील, पाचव्या वेतन आयोगाच्या तरतुदीप्रमाणे करण्यात आलेल्या वेतननिश्चितीच्या, दि. ६.१.२००४ रोजी त्यांची प.प्रा.शिक्षक या पदावर नियुक्ती झाल्यामुळे करण्यात आलेल्या वेतननिश्चितीच्या साक्षांकित प्रतींची व संदर्भित प्रकरणातील प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव,पदनाम, कार्यालयाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक अशा माहितीची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याच्या कारणास्तव त्यांचे प्रथम अपील फेटाळले आहे.जन अपिलीय अधिकारी यांची कार्यवाही योग्य नाही.अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची किमान आणखी एक संधी देणे आवश्यक होते. तसेच अपिलाच्या गुणवत्तेनुसार अपिलासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे, भविष्यात ही बाब त्यांनी लक्षात ठेवावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली तसेच शाळापातळीवरील माहिती संकलीत करुन घेऊन ते अपिलार्थीस पुरवतील, असे आयोगास आश्वासित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, रा.बाबरगाव,पो. पेंडापूर व्हाया वाळूज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, : अपीलकर्ता
रा.बाबरगाव, ता.गंगापूर,औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री.पंचगल्ले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद -प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार,अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०१-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींमधील, त्यांची गटसाधन केंद्र गंगापूर येथून जि.प.प्रशाला गंगापूर येथे पदस्थापना झाल्याचे गट शिक्षणाधिकारी कार्यालयाचे आदेश, मुख्याध्यापक,जि.प.प्रशाला,गंगापूर यांनी अर्जदार प्रशाळेत उपस्थित झाल्याबाबतचा गटसाधन केंद्र गंगापूर,पं.स.गंगापूर यांना पाठविलेला अहवाल,रुजू अहवाल व त्यांचे जि.प.प्रशाला गंगापूर येथून प्रा.शा.बाबरगाव केप्राशा गंगापूर येथे पदविधर प्राथमिक शिक्षक या पदावर झालेल्या पदोन्नतीचे आदेश तसेच संबंधित पदावर अर्जदार संबंधित शाळेत उपस्थित झाल्याबाबतचा मुख्याध्यापक के.प्रा.शाळा गंगापूर यांनी ग.शि.अ.कार्यालयास पाठविलेला रुजू अहवाल या माहितीच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली तसेच शाळापातळीवरील माहिती संकलीत करुन घेऊन ते अपिलार्थीस पुरवतील, असे आयोगास आश्वासित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, रा.बाबरगाव,पो. पेंडापूर व्हाया वाळूज, ता.गंगापूर,

जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, | : | अपीलकर्ता |
| रा.बाबरगाव, ता.गंगापूर,औरंगाबाद | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री. पंचगल्ले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद -प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार,अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०१-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०१-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवाविषयक बाबींमधील, त्यांच्या कें.प्रा.शाळा माळुंजा बु. येथून गटसाधन केंद्र गंगापूर येथे गट समन्वयक या पदावर प्रतिनियुक्तीने झालेल्या बदलीचे मा. प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.औरंगाबाद यांचे आदेशाच्या तसेच गट साधन केंद्र गंगापूर येथे रुजू झाल्याच्या वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्या रुजू अहवालाच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या ते कार्यालयात उपलब्ध असलेली तसेच शाळापातळीवरील माहिती संकलीत करुन घेऊन अपिलार्थीस पुरवतील, असे आयोगास आश्वासित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, रा.बाबरगाव,पो. पेंडापूर व्हाया वाळूज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वसंत बाबुराव पाटील, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.

जन अपिलीय अधिकारी तथा :
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.),
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

१ अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३६९

२ सुनावणीची तारीख दि. ११-०१-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी- श्री. वसंत बाबुराव पाटील : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी -उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई- : अनुपस्थित

३.३ जन अपिलीय अधिकारी - महाव्यवस्थापक (क.व औ.सं.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई. : अनुपस्थित

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २१-०७-२००६

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १९-०८-२००६

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १५-०३-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३१-०५-२००८ (फेरसादर दि.१५.०२.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी औरंगाबाद कार्यालयातील श्री. सुभाष देवकर,व.लि.यांच्यामार्फत दि. ११.०१.२०११ रोजीचे पत्र आयोगास सादर करुन त्याद्वारे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्याची आयोगास विनंती केलेली आहे. आज रोजी अपिलार्थी यांनी सुनावणी पुढे ढकलण्यास त्यांची हरकत नाही, असे आयोगास सांगितले.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंत बाबुराव पाटील, १०१ शुक्रतारा अपार्टमेंट,वसुंधरा कॉलनी,सिडको,एन-७, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई -८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क.व औ.सं.),महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई -८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किशोर भिकनसिंग राजपूत,<br>रा.औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>जागृती प्राथमिक शाळा,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्रा.),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. किशोर भिकनसिंग राजपूत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्याध्यापिका, जागृती प्राथमिक शाळा,औरंगाबाद - सौ. पालकर एस.व्ही. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद- प्रतिनिधी श्री. बाळासाहेब पवार, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०५-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०७-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०९-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०९-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडील वेगवेगळया पत्रान्वये टप्प्याटप्प्याने पुरविली असल्याचे आयोगास अवगत केले. ही बाब आज सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी मान्य केली. अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५,६,८ व ११ च्यासंदर्भात काही स्पष्टीकरणात्मक खुलासे मागितले. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी स्पष्टीकरण दिले. यावर अपिलार्थी यांचे समाधान झाले आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक : ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, रा.एन-६, सिडको,ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जागृती प्राथमिक शाळा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के, : अपीलकर्ता
रा.भराडी, ता. सिल्लोड,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, सिल्लोड, जि. औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,सिल्लोड,जि. औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(म-१), तहसील कार्यालय,सिल्लोड,जि.औरंगाबाद-प्रतिनिधी-श्री. संजय तुकाराम मोकासे, क.लि. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०७-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०९-२००८ (फेरसादर दि.१२-०८-२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील निकालपत्राच्या प्रतीचा व संबंधित संचिकेचा शोध त्यांच्या कार्यालयामध्ये तसेच अभिलेख कक्षात उपलब्ध संकीर्ण विभागातील संचिकेच्या रॅकमध्ये युध्दपातळीवर पडताळणी व निंदणी करुन विषयांकित माहितीचा शोध अ.का.(राजस्व), अभिलेखापाल यांनी सलग दोन दिवस घेतला परंतु विषयांकित संचिका आढळून आली नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देता आली नाही. ही बाब दि. २१.०१.२००९ रोजी तहसीलदार, सिल्लोड यांच्यातर्फे अपिलार्थीस कळविण्यात आली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि सदरची संचिका का उपलब्ध होऊ शकली नाही तसेच कार्यालयात अभिलेख जतन करण्याची तहसीलदार, सिल्लोड कार्यालयातील कार्यपध्दती व व्यवस्था इत्यादीबाबत उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी व्यक्तिशः दखल घेणे आवश्यक आहे. याकरिता त्यांनी याबाबत सर्व पहाणी करुन तहसीलदार कार्यालयास सुधारणा सूचवाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के,रा.भराडी, ता. सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-१), तहसील कार्यालय,सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी,<br>रा.सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय सिल्लोड, जि. औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,सिल्लोड,जि. औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, सिल्लोड,जि.औरंगाबाद- श्री. रंगनाथ किशनराव मेंडके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-०३-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०५-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०९-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने एकूण १५ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्याकरिता ४१ पानांचे प्रतिपृष्ठ रु.१०/- प्रमाणे एकूण रु.४१०/- इतके शुल्क तहसील कार्यालयात जमा करण्याकरिता त्यांच्याकडील दि.१९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०२.०६.२००८ रोजी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड यांना शुल्क भरुन घेऊन अपिलार्थीस निकालाच्या तारखेपासून आठ दिवसांचे आत माहिती पाठविण्यात यावी, असा निर्णय दिला होता. तहसीलदार कार्यालय, सिल्लोड यांच्यातर्फे अपिलार्थीस पुन्हा दि. ११.०६.२००८ रोजी उक्त शुल्क कार्यालयात भरुन माहिती हस्तगत करण्याचे कळविले आहे. आज रोजी आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती अवलोकनास्तव सादर केली. सदर माहिती सकृतदर्शनी योग्य आहे, असे दिसून येत आहे.

आयोगाचे असे निदर्शनास आले आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,सिल्लोड यांनी अपिलार्थीस माहितीच्या शुल्कापोटी प्रतिपृष्ठ रु.१०/- ची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियम,२००५ अन्वये माहितीसाठी शुल्कदर प्रतिपृष्ठ रु.२/- अनुज्ञेय आहे.ही बाब त्यांनी भविष्यात लक्षात ठेवावी. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या १५ मुद्यांवरील एकूण ४१ पृष्ठांच्या माहितीच्या साक्षांकित प्रती विनामूल्य पाठवाव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,सिल्लोड यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या साक्षांकित प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी, प्लॉट नं.२४०, सदगुरु निवास,टिळकनगर, सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनिलकुमार बाबुराव सोनकामळे,<br>१४, सागर प्लाझा अपार्टमेंट, ज्योतीनगर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>टोल मॉनिटरींग युनिट, रस्ते विकास महामंडळ मर्या. मुंबई | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, रस्ते विकास मंडळ मर्या. पथकर नियंत्रण कक्ष, मुंबई | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, रस्ते विकास मंडळ मर्या. पथकर सनियंत्रण कक्ष, मुंबई | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-११-२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-१२-२००६ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०१-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर करताना अपिलाच्या कारणामध्ये नमूद केले आहे की, त्यांना चुकीची व अपुरी माहिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपिलानंतर पाठविलेल्या माहितीमध्ये तफावत आहे व दिनांक ०८-१२-२००६ रोजी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयाशी ते असहमत आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. तथापि त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचा एक संच आयोगाच्या कागदपत्रात आहे. त्या माहिती-मधील कोणती माहिती चुकीची व अपूरी आहे याचा आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे खुलासा होऊ शकला नाही. तथापि अपिलार्थी यांना मिळालेल्या मुद्दयांवर अधिकची माहिती त्यांना पाहिजे असल्यास त्यांनी स्वतंत्र अर्ज करावा असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिका-याने भविष्यात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत अर्जदारांना अचूक माहिती पुरविली जाईल याची दक्षता घेण्याची आवश्यकता राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिलकुमार बाबुराव सोनकामळे, १४, सागर प्लाझा अपार्टमेंट, ज्योतीनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, रस्ते विकास मंडळ मर्या. पथकर नियंत्रण कक्ष, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, रस्ते विकास मंडळ मर्या. पथकर सनियंत्रण कक्ष, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मनोहर किशनराव पाडळकर,<br>५२, श्रीनगर, उल्कानगरजवळ, गारखेडा परिसर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा हिवताप अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>ॲडिशनल डायरेक्टर ऑफ मलेरिया ॲण्ड फायलेरिया,<br>विश्रामवाडी पोलीस स्टेशन जवळ, पुणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनोहर किशनराव पाडळकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा हिवताप अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-१२-२००४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०३-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांना सहाय्य करण्यासाठी श्री. सुधाकर देशपांडे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या सहायकांनी आयोगापुढे त्यांची बाजू मांडली व प्रकरणी सविस्तर खुलासा आयोगास अवगत केला. त्यावरुन प्रश्नाधीन दिनांक ३०-०९-२००४ च्या माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भात असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने दिनांक ०८-०४-२००९ रोजी स्वतंत्रपणे नव्याने माहितीचा अर्ज दाखल केला आहे व जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त न झाल्याने दिनांक २६-०५-

२००९ रोजी प्रथम अपील केले आहे. प्रथम अपिलावर सुनावणी न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १३-०८-२००९ रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्या तक्रार अर्जावर राज्य माहिती आयोगाने दिनांक २५-०८-२००९ रोजी निर्णय घेऊन आदेश पारीत केले आहेत. त्याचप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडील या व्दितीय अपिलावर सुनावणी होऊन दिनांक ०६-०७-२०१० रोजी आयोगाने निर्णय पारीत केला आहे. या नव्याने (दिनांक ०८-०४-२००९ रोजी) केलेल्या अर्जाच्या संदर्भात आयोगाकडे पुढील कारवाई विचाराधीन आहे. म्हणून दिनांक ३०-०९-२००४ रोजी केलेल्या याच संदर्भातील मूळ अर्ज दप्तर दाखल करणे योग्य ठरत आहे. यास अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सहमती दर्शविली आहे. अतः तो दप्तर दाखल करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

दिनांक ३०-०९-२००४ चे व्दितीय अपील बंद करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर किशनराव पाडळकर, ५२, श्रीनगर, उल्कानगरजवळ, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

डॉ. सुभाष माने, : अपीलकर्ता
विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सह निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर निबंधक, कार्यालय, सहकारी संस्था, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद<br>- श्री. ज्ञानदेव मुकणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>- प्रतिनिधी - श्रीमती सविता जगताप, सहायक निबंधक (मजूर), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०३-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०४-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच व्दितीय अपील राज्य माहिती आयोगास सादर करणारे डॉ. सुभाष माने, विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद हे अनुपस्थित आहेत, त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. त्यांनी व्दितीय अपील केल्यामुळे त्यांना उपस्थित राहणे आवश्यक होते याची त्यांनी नोंद घ्यावी.

सध्याचे जन माहिती अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, परभणी यांचा अहवाल तसेच विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचा अहवाल या कार्यालयाच्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे व चलनाव्दारे रक्कमेचा भरणा करुन या अहवालाची प्रत व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी असे अपिलार्थींना कळविण्यात आले होते. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक ०४-०३-२००७ रोजी माहिती प्राप्त करुन त्याची पोहच दिली आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अवगत केलेली वस्तुस्थिती बरोबर आहे असे आढळून आले आहे. याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-१२-२००६ रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, अतिरिक्त निबंधक श्री. डी. बी. शेळके यांच्या अहवालाची प्रत त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही त्यामुळे ती देता येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०३-२००७ रोजी प्रथम अपिलावर निर्णय देतानाही सदरचा चौकशी अहवाल उपलब्ध नाही याची नोंद घेताना निर्णय दिला होता की, सदरचा चौकशी अहवाल अर्जदारास यांना २० दिवसाच्या आत द्यावा. तथापि तो जन माहिती अधिकारी देऊ शकले नाहीत ही बाब आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कायम केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, संबंधति अहवाल हा त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाला नाही व तो ज्यांच्या ताब्यामध्ये (कस्टडीत) होता त्या संबंधित कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई केलेली आहे. प्रश्नाधीन अहवालाचे प्रशासकीय महत्व इत्यादी सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित कर्मचा-याविरुध्द यथायोग्य कारवाई झाली आहे का हे पहाणे आवश्यक आहे. मूळ अर्जदार यांनी व्दितीय अपील दाखल केलेले नाही याचीही नोंद आयोग घेत आहे. या पार्श्वभूमीवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२००७ रोजी दिलेले आदेश निष्प्रभ करुन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुभाष माने यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन हे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

विचाराधीन प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. सुभाष माने, विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

२. विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहंमद अखील मोहंमद बु-होद्दीन,<br>रा. शहानवाज शहीद मस्जीद जवळ, शहानूरवाडी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, अल अमीन उर्दू प्राथमिक शाळा, आसेफिया कॉलनी, घाटी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहंमद अखील मोहंमद बु-होद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, अल अमीन उर्दू प्राथमिक शाळा, आसेफिया कॉलनी, घाटी, औरंगाबाद<br>- श्रीमती वाजेदा बेगम शो. हमीद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०३-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४-०३-२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०४-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०५-२००७ फेरसादर दि. ११-०३-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने एकूण वीस मुद्दयांवर माहिती मागितली होती. त्यांना ३७०० पानांची माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थीने ही बाब आयोगासमोर आज मान्य केली. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या मुद्दयांपैकी प्रश्नवजा व खुलासेवजा माहिती देय नाही. अपिलार्थीने ही बाब मान्य केली तथापि काही मुद्दयांवर माहिती मिळाली नाही असे सांगितले. जे खालीलप्रमाणे आहेत.

१. मुद्दा क्रमांक ५,

२. मुद्दा क्रमांक ६,

३. मुद्दा क्रमांक १४

या मुद्दयांवरील माहिती यापूर्वी इतर अर्जाचे संदर्भात अपिलार्थीस देण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. तथापि या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस पुरवावी लागेल. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसात कार्यवाही करावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अखील मोहंमद बु-होद्दीन, रा. शहानवाज शहीद मस्जीद जवळ, शहानूरवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अल अमीन उर्दू प्राथमिक शाळा, आसेफिया कॉलनी, घाटी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार, : अपीलकर्ता

'त्रिवेणी', जिल्हा न्यायालयामागे, केसरसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर निबंधक, सहकारी संस्था (आस्थापना), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा अध्यक्ष सहकार कल्याणी निधी, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे खाजगी सचिव तथा सदस्य सचिव, सहकार कल्याण निधी, पुणे - श्री. रविंद्र ल. गोसावी, | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा अध्यक्ष, सहकार कल्याण निधी, पुणे - प्रतिनिधी - श्री. रविंद्र ल. गोसावी, सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव तथा सदस्य सचिव, सहकार कल्याण निधी, पुणे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०३-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०४-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०५-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०७-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, प्रश्नाधीन सहकार कल्याण निधी कोरेगांव पार्क, पुणे या विश्वस्त संस्थेचा समावेश सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये होत नसल्याने (माहिती अधिकार अधिनियम कलम २ (ज)) हा कायदा या संस्थेस लागू होत नाही. म्हणून जन माहिती अधिकारी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यास देऊ शकले नाहीत. याबाबत अध्यक्ष, सहकार कल्याणी निधी, पुणे यांनी प्रथम अपिलाच्या संदर्भात दिनांक २४-०५-२००७ रोजी निर्णय दिला आहे की, या संस्थेचा माहिती अधिकार अधिनियमामध्ये समावेश होत नसल्याने या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाहीत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, सहकार आयुक्त हे शासकीय अधिकारी असून ते संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष असल्यामुळे ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण या व्याप्तीमध्ये मोडते. त्यामुळे त्यांनी केलेले कामकाज, झालेले निर्णय व इतर अनुषंगीक कागदपत्रे त्यांना मिळाली पाहिजेत. अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की, या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ज) लागू होत आहे.

विश्वस्त संस्था सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत मोडत नाहीत. त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही व असे निर्णय आयोगाने वेळोवेळी जाहिर केलेले आहे. तसेच त्याबाबत मा. उच्च न्यायालयाचा निर्णय आहे. खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८-०४-२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणात विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. तथापि दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यावर या आयोगाचे असे मत झाले आहे की, या संस्थेच्या संदर्भात शासन किंवा जिल्हा / विभागीय स्तरावरील शासनाचे कार्यालय यांच्याशी संस्थेने पत्रव्यवहार केल्यामुळे शासन व त्यांची इतर कार्यालयामार्फत जी कागदपत्रे तयार झ ाली आहेत ती कागदपत्रे सार्वजनिक हितामध्ये (Public Domain) येतात त्याच्या शासनाकडील साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस मिळू शकतात म्हणून त्या द्याव्या लागतील. अपिलार्थीने मागितलेल्या एकूण १४ मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक २, ४, ६, १२ व १३ या मुद्दयांवरील मागितलेल्या माहितीची कागदपत्रे ही शासन प्रशासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेली आहेत त्यामुळे त्यांची एक प्रत अपिलार्थीस देय ठरते व ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. यास सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने सहमती दर्शविली.

अतः आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक २, ४, ६, १२ व १३ शी संबंधित माहितीच्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व

नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर धनाजी पवार, 'त्रिवेणी', जिल्हा न्यायालयामागे, केसरसिंगपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे खाजगी सचिव तथा सदस्य सचिव, सहकार कल्याण निधी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा अध्यक्ष, सहकार कल्याण निधी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नामदेव पुंडलीक कोल्हे,<br>रा. राजे संभाजी कॉलनी, प्लॉ. नं. २४, २६, जळगांव रोड, पोस्ट हरसूल, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्रीमती एस. आर. भाले, प्र. तहसीलदार, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०८-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०९-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-११-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अजूनही अपिलार्थीस माहिती दिलेली आढळून येत नाही व ही बाब गंभीर आहे. अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक २०-०८-२००७ रोजीचा आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तरी या प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी स्वतः लक्ष पुरविणे आवश्यक ठरले आहे आणि जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास ती जन माहिती अधिकारी एका महिन्याच्या आत देतील असे त्यांना व्यक्तिशः पहावे लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांनी या प्रकरणामध्ये झालेल्या विलंबाबाबत त्यांचा खुलासा विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे मार्फत आयोगास सादर करणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

१. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडून वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरविली जाईल असे व्यक्तिशः पहावे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत त्यांचा खुलासा विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे मार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलीक कोल्हे, रा. राजे संभाजी कॉलनी, प्लॉ. नं. २४, २६, जळगांव रोड, पोस्ट हरसूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,

जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हिरालाल शितलजी माहोरे,<br>५-१२-४८, मामा चौक, पदमपुरा, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्न निरिक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- श्री. आर. आर. घडमोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद<br>- डॉ. एस. जी. देवगांवकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०७-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २७-०८-२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०९-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१-१२-२००७<br>फेरसादर दिनांक<br>२२-१२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९९८-९९ सालातील परवान्याबद्दलच्या माहितीची कागदपत्रे मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या या माहितीचा कार्यालयात शोध घेण्यात येत असून माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस कळविण्यात येईल असे अपिलार्थीस दिनांक २७-०८-२००९ कळविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक १८-०९-२००८ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कळविले की, प्रकरणात सुमारे ७/८ वर्षाचा कालावधी झाला असल्यामुळे सदर कागदपत्रे जतन केल्याचे दिसून येत नाही व कागदपत्रे शोधण्याचे काम चालू असून प्राप्त होताच त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, कागदपत्र उपलब्ध झाली नसून त्यांच्याकडील असलेल्या नियमानुसार ही कागदपत्रे पाच वर्षापेक्षा जुनी असल्याने नष्ट करण्यात आली आहेत. यास्तव ही कागदपत्रे आता अपिलार्थीस देता येणार नाही ही बाब जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस कळवावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरालाल शितलजी माहोरे, ५-१२-४८, मामा चौक, पदमपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्न निरिक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नरसिंग रामचंद्र कोटीये,<br>मु. पो. फर्दापूर, तालुका सोयगाव, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव,<br>तालुका सोयगाव, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव,<br>तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. व्ही. नरवडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव,<br>तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०५-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०६-२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०८-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०-०९-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१०-२००७ फेरसादर दि. ०३-१०-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत काही तपशील त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०६-२००७ रोजी मागितला होता. त्यानंतर दिनांक २१-०८-२००७ रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी अस्वच्छ प्रमाणपत्राच्या नकला कार्यालयात नियमानुार फी भरुन घेऊन जाव्यात असे कळविले होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना उर्वरीत माहिती अभिलेख कक्षात शोध घेऊन अपिलार्थीस देण्याचे आदेशित केले होते. त्याप्रमाणे आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीस सर्व माहिती दोन टप्प्यात दिनांक १४-१२-२००७ व १४-०१-२००८ रोजी दिलेली आहे. त्यामुळे हे प्रकरण बंद करण्यात यावे अशे आयोगाचे मत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नरसिंग रामचंद्र कोटीये, मु. पो. फर्दापूर, तालुका सोयगाव, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोयगांव, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीरंग मारुती वारे, : अपीलकर्ता
मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कारागृह महानिरिक्षणालय, महाराष्ट्र राज्य, जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे - ०१

जन अपिलीय अधिकारी, :
कारागृह महानिरिक्षणालय, महाराष्ट्र राज्य, जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे - ०१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>रचना व कार्यपध्दती अधिकारी, कार्यालय कारागृह महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कारागृह उप महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे - प्रतिनिधी<br>- श्री. पी. जी. शितोळे, वरिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. रामराव तुळशीराम राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०६-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-१०-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक २१-०६-२००८ रोजी पाठविण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा एकदा तीच माहिती दिनांक ०९-०७-२००८ रोजी पाठविण्यात आली आहे. उपलब्ध कागदपत्रा-वरुन ही बाब आयोगास आढळून आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीरंग मारुती वारे, मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा रचना व कार्यपध्दती अधिकारी, कार्यालय कारागृह महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उप महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे,<br>बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. डी. सोनवणे | : | उपस्थित |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. बी. एन. वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०९-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१०-२००८ |

फेरसादर दिनांक
२३-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, पूर्वी अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे. तथापि सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले की, ती अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली तीन मुद्यांवरील माहिती आयोगासमोर अपिलार्थीस हस्तांतरीत करण्यात आली व अपिलार्थीने ती घेतली आहे. उर्वरित मुद्दा क्रमांक ४ ची माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस सात दिवसात पुरवतील असे त्यांनी मान्य केले. जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांनी कार्यकक्षेमध्ये अमुलाग्र सुधारणा होण्याकरिता व्यक्तीशः लक्ष घालणे आयोगास आवश्यक वाटते. तरी त्यांनी स्वतः लक्ष घालावे अशी आयोगाची शिफारस आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रभुदास एस. भालेराव,<br>कमलारतन प्लॉझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना<br>- प्रतिनिधी - श्री. एस. ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ११-०९-२००७ (प्रत जोडलेली नाही) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३-११-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २८-११-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३-०१-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे

प्राप्त झालेला नाही, त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. त्याचप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये सुध्दा अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत उपलब्ध नाही. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये दिनांक २८ नोव्हेंबर २००७ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला की, अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्यात यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत संपूर्ण माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस पुरवाव्या लागतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस संपूर्ण माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभुदास एस. भालेराव, कमलारतन प्लॉझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपीलकर्ता
दाना बाजार, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना - श्री. अब्दुल खुद्दस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०१-२००८ (प्रत जोडलेली नाही) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०६-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी नुकताच ३/४ महिन्यांपूर्वी कार्यभार घेतला आहे व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी आता तयार करुन ठेवली आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती त्वरीत पाठवाव्या लागतील.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलात कागदपत्रे अपूर्ण आढळून आली आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीच्या साक्षांकीत प्रमाणित प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, दाना बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख करीम शेख बाबामियाँ, : अपीलकर्ता
रा. दहीपुरी, पो. दहीपुरी, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख करीम शेख बाबामियाँ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) सर्वे उपविभाग, जालना - श्री. सोपान शंकरराव खिलारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी,<br>जिल्हा जालना - श्री. बी. जे. पांचाळ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०३-२००८ (प्रत जोडलेली नाही) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०५-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, दोनही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, सदरचे प्रकरण हे जालना उपविभागाशी संबंधित नसून ते घनसावंगी उपविभागाशी संबंधित आहे.

तसेच जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी यांनी आयोगास अवगत केले की, सदरचा अर्ज त्यांच्याकडे आता वर्ग करण्यात आला आहे. अपिलार्थी यांनी एकूण १७ कामांवरील माहिती विस्तृत स्वरुपात मागितली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पाहण्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (९) प्रमाणे उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित केले. आयोगासमोर अपिलार्थीने ही बाब मान्य केली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख करीम शेख बाबामियाँ, रा. दहीपुरी, पो. दहीपुरी, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,

घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विकासकुमार बागडी,<br>नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विकासकुमार बागडी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना<br>- प्रतिनिधी - श्री. एस. ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०५-२००८ (प्रत जोडलेली नाही) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०७-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-१२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलात कागदपत्रे अपूर्ण आहेत असे आढळून आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थीस यापूर्वी माहिती देण्यात आलेली नाही ही बाब खरी आहे. अपिलार्थीस माहिती पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल व आवश्यक असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. आयोगासमोर अपिलार्थीने ही बाब मान्य केली. तथापि अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास विनंती केली की, त्यांना मागितलेली माहिती आतापावेतो मिळालेली नाही त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात यावी. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना, या प्रकरणात माहिती अधिकार अधिनियमाच्या कलमानुसार विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी / कर्मचारी जे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जबाबदार आहेत त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत एक दिवस सुनिश्चीत करुन पहाणीकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य देण्यात याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकासकुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे पाथ्रीकर,<br>मु. पो. पाथरी (इंदिरानगर), तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना - श्री. अब्दुल खुद्दस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-०५-२००८ (प्रत जोडलेली नाही) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलात कागदपत्रे अपूर्ण आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती पुरविलेली आहे व यासंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १५-०६-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे की, त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर कार्यालयाने उपलब्ध करुन दिली असल्याने त्यांचे पूर्णपणे समाधान झाले असून त्यांचे प्रकरण निकाली काढावे. याबाबतचे लेखी निवेदन उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर यांनी दिनांक ०४-११-२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले आहे असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे पाथ्रीकर, मु. पो. पाथरी (इंदिरानगर), तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अखिल खॉ इस्माईल खॉ पठाण,<br>रा. वरफळ, तालुका परतूर, जिल्हा जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर,<br>जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना - श्री. अब्दुल खुद्दस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - प्रतिनिधी - श्री. एस. ईथिराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०५-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलात कागदपत्रे अपूर्ण आहेत असे सुनावणीच्या वेळी आढळून आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण ८४ कामांची ३/४ वर्षाची माहिती मागितली आहे. त्यामध्ये मस्टर व अंदाजपत्रके यांची माहिती आहे. अशी विस्तृत माहिती मागितली असल्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयात ही माहिती अपिलार्थीस पाहणीसाठी प्रस्तावित करत आहेत. तथापि अपिलार्थीचा मूळ अर्ज पाहता त्यांनी माहितीचा संबंधित कालावधी तीन दिवस दिनांक २७-०१-२००८ ते २९-०१-२००८ असा नमूद केला आहे त्यामुळे त्यांना ही माहिती देय आहे. तरी जन माहिती अधिकारी यांना या तीन दिवसांच्या कालावधीतील माहिती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने द्यावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे नमूद केलेल्या कालावधीशी संबधित मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अखिल खॉ इस्माईल खॉ पठाण, रा. वरफळ, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आसाराम शामराव पुरुळे, : अपीलकर्ता
रा. परतूर, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर),
उपविभाग परतूर,जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग परतुर, जि.जालना- श्री.अब्दुल खुद्दुस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग जालना - प्रतिनिधी - श्री. एस.ईतीराज, शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे केलेल्या अर्जाची तारीख | | दि. प्रत जोडलेली नाही. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०३-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०६-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ल.पा. (स्था.स्तर), उपविभाग, परतूर, जि. जालना या पदाचा कार्यभार ३-४ महिन्यापासून स्वीकारला आहे. अपिलार्थीच्या विचाराधीन माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याचे दिसून आले नाही. अपिलार्थी यांनी दि. १८.०६.२००८ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलासोबत प्रपत्र-'अ' जोडल्याचे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिला किंवा कसे, हे ही आयोगास ज्ञात होऊ शकले नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. अपिलार्थी यांनी सदर आदेश प्राप्त होताच जन माहिती अधिकारी तसेच उप विभागीय अधिकारी, ल.पा.(स्था.स्तर),उपविभाग,परतूर, जि.जालना यांच्याकडे मूळ अर्जाची प्रत पंधरा दिवसांच्या आत पाठवावी. ती प्रत प्राप्त होताच त्यावर तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीची व्याप्ती व्यापक आढळल्यास अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेख्यांचे निरीक्षण करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस व वेळ निश्चित करुन त्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती देण्याबाबतची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी करावी.

अतः वरील निर्देशानुसार आयोगाचे स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील बंद करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आसाराम शामराव पुरुळे, मु.पो.साठेनगर,परतुर,ता.परतुर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अविनाश बालराज नगरे,<br>रा.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे सिंचन, जि.प.<br>उपविभाग परतूर,जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग, जिल्हा परिषद,जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. अविनाश बालराज नगरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे जि.प. (सिंचन) उपविभाग परतुर, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग,जिल्हा परिषद,जालना | : | अनुपस्थित |
| ४. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०७-२००८ |
| ५. | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६. | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०८-२००८<br>(प्रत जोडलेली नाही.) |
| ७. | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१०-२००८ |

८. राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-११-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने लघुपाटबंधारे (सिंचन) उपविभाग,परतुर यांच्या कार्यालयातील दि. १५.०५.२००७ ते १५.०६.२००७ या कालावधीतील कॅशबुकच्या नोंदीच्या पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत, त्या आजपावेतो देण्यात आलेल्या नाहीत, असे आयोगाच्या नजरेस आले आहे. या माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील. या प्रकरणात अपिलार्थीस माहिती पाठविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी व प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्यावर शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा एकत्रित खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत आयोगाचे कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना यांचेमार्फत सादर करावा.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

२) अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे जि.प. (सिंचन) उपविभाग परतुर, जि.जालना व त्या कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना यांच्यामार्फत आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश बालराज नगरे, रा.रंगारगल्ली, कादाबाद,जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जि.प.लघुपाटबंधारे (सिंचन), उपविभाग परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपीलकर्ता
रा.पाथरवाला बु. ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०४-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०५-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००८ (फेरसादर दि.२५.११.२००९) |

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत तथापि सुनावणीच्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.८, जि.प. जालना यांनी आयोगास विनंती केली की, ते आयोगासमोरील अन्य सुनावणीकरिता आयोगाचे कार्यालयात उपस्थित झाले आहेत व सदर प्रकरणाचे सूचनापत्र(नोटीस) संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अप्राप्त आहे, याबाबत त्यांनी आज संबंधितांकडे दूरध्वनीद्वारे खात्री केली आहे व सदर प्रकरणात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देण्याची विनंती आयोगास केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला बु. ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राम गोरखनाथ पार्वे, : अपीलकर्ता
रा.चिंचखेड, ता.अंबड,जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, अंबड,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,जि. जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. राम गोरखनाथ पार्वे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तालुका कृषि अधिकारी,अंबड,जि.जालना - श्री. आर.एम.दिंडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, परतूर,जि.जालना -श्री. पी.एस.बरदाळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-११-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-१२-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७-१२-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०२-२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती एकूण १३,७२४ पृष्ठांची असल्याने माहितीपोटीचे शुल्क रु. २७,४४८/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १३.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थी एवढी मोठी रक्कम भरु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००१ ते ३१.०३.२००७ इतका मोठा असून यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत अंबड तालुक्यातील चिंचखेड,राहुवाडी,पिंपरखेड येथे झालेल्या कामांची माहिती जसे, माती बंधारे, नालाबंडींग,शेततळे,सिमेंट बंधारे, गांडुळ शेड बांधलेल्या शेतकऱ्यांचे नाव व मजूरांचे हजेरीपत्रकांची छायांकित प्रत, पगारवाटपाच्या छायांकित प्रती, गव्हाचे कुपन, मजुरांना वाटप केलेल्या कुपन्सच्या छायांकित प्रती, एम.बी.च्या छायांकित प्रती अशी व्यापक स्वरुपाच्या माहितीची मागणी केली आहे. या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(९) अन्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे कोणतेही तीन दिवस निश्चित करुन कार्यालयीन वेळेत उपरोक्त माहितीशी संबंधित अभिलेख्यांची पहाणी करुन अपिलार्थी त्यामधून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनाशुल्क उपलब्ध करु शकतील. अपिलार्थीने ही बाब मान्य केली. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत याप्रमाणे कार्यवाही करावी.उक्त कार्यवाही विहित मुदतीत होईल, याची जन अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या विस्तृत स्वरुपाच्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पहाणीसाठी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सलग तीन दिवसांसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम गोरखनाथ पार्वे, रा.चिंचखेड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतुर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अन्सीराव बापूराव शिंगाडे, : अपीलकर्ता
रा.नारायणगाव, ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि कार्यालय, अंबड,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी, :
तालुका कृषि कार्यालय, अंबड,जि. जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय अंबड,जि.जालना - श्री. ए. आर. शेंद्रे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी,अंबड,जि.जालना -श्री. आर.एम.दिंडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०८-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-१२-२००८ (फेरसादर,दि.२३.०३.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती व्यापक प्रमाणावर आहे व त्यासाठी त्यांच्या कार्यालयात निधी उपलब्ध नसल्याचे त्यांच्याकडील दि. २९.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळवून या माहितीशी संबंधित अभिलेखे निरीक्षण करण्यास उपलब्ध असल्याबाबत सूचित केले होते. अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखांची पहाणी करुन घेतली असल्याचे त्यांच्या दि. २१.०२.२००९ रोजीच्या निवेदनात नमूद केले असून त्यांचा अर्ज निकाली काढावा अशी विनंती तालुका कृषि अधिकारी,अंबड यांना केली आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्राप्त झाली आहे, असे दिसून येत आहे.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंगाडे अन्सीराव बापूराव, मु.नारायणगाव,पो.झिर्पी, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, जि.जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजी भाऊराव बनकर, | : | अपीलकर्ता |
| रा.बुटखेडा, ता.जाफ्राबाद, जि.जालना | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| तहसीलदार, तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,जाफ्राबाद, जि.जालना - श्री. एन.एम.देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जाफ्राबाद,जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-१२-२००८ (फेरसादर,दि.१९.०१.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी वेगवेगळया टप्प्यामध्ये पुरविली आहे.याबाबत तहसीलदार, जाफ्राबाद यांनी दि. १२.०१.२०११ रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये ही बाब त्यांनी नमूद केली आहे व प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना मिळाल्याबद्दलची पोच दिल्याचे तहसीलदार यांनी नमूद केले आहे.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर, बुटखेडा,पो.अकोला (देव), ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अन्सीराव बापूराव शिंगाडे,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा कृषि अधिक्षक कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालय, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि उपसंचालक, कार्यालय जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जालना - श्री. ए. आर. काळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६-०७-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०८-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२००८<br>(फेरसादर,दि.२३.०३.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या स्तरावर जतन केली जाते, त्यामुळे संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांच्याकडील दि. १६.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले होते व या पत्राची प्रत संबंधित सर्व तालुका कृषि अधिकारी कार्यालयास अग्रेषित केली होती. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि. २२.१२.२०१० रोजीचे एक निवेदन सादर केले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना विचाराधीन द्वितीय अपीलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असून सदर अपील रद्द करण्याची विनंती केली आहे. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी या दोनही पत्रांची प्रत आयोगास सादर केली आहे. आज सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्राप्त झाली आहे, असे दिसून येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंगाडे अन्सीराव बापूराव, द्वारा राम लांडे, होळकर नगर, अंबड, ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपीलकर्ता
रा.पाथरवाला बु. ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथ.),जिल्हा परिषद, जालना- श्री.जी. एम.कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना - प्रतिनिधी - श्री. पी. आर. सवडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०३-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४-०४-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०७-२००८ (फेरसादर दि.११.१२.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.११.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि. २७.०३.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पुरविण्यात आली आहे. मात्र अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली नाही. तथापि प्रथम अपिलाच्या सुनावणीनंतर त्यांना माहिती प्राप्त झाली आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १७.०६.२००८ रोजी सदरचे प्रथम अपील फेटाळून लावण्याचा निर्णय घेतला आहे.

अत: जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नसल्यामुळे आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात आहे.

**<u>आदेश</u>**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला बु., ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळू भास्कर बनसोडे, : अपीलकर्ता
रा. जामगांव, पो.रघुनाथनगर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
रायगड

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
रायगड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाळू भास्कर बनसोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>रायगड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०९-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००६ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-१०-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-१०-२००७ (मुंबई कार्यालयाकडे |

प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, ते स्वतः जवळ जवळ १०० टक्के दृष्टीहीन आहेत आणि अशाच महाराष्ट्रात ५८०९६६ दृष्टीहीन व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांनी रायगड जिल्ह्यामध्ये अशा किती १०० टक्के अंध व्यक्तींना स्वस्त धान्य दुकाने मंजूर केली याबाबत माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील माहिती संबंधित जिल्ह्याच्या माहिती अधिका-यांकडे मागितली आहे. त्यांचा उद्देश अशा व्यक्तींना शासनाकडून स्वस्त धान्य दुकान मिळवून द्यावयाचा असा स्तुत्य आहे. त्यांच्या दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या अर्जास प्रथम उत्तर देताना जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांनी प्रथम दिनांक २१-०९-२००६ रोजी दहा रुपयाचा कोर्ट फी स्टॅम्प लावला नसल्यामुळे तांत्रिक कारणास्तव अर्जदाराचा अर्ज परत पाठविला आहे असे आढळून येते. अर्जदाराची स्थिती लक्षात घेऊन त्यांनी अर्जदारास मदत करणे योग्य झाले असते असे आयोगाचे मत आहे. यानंतर अपिलार्थीने दहा रुपयाचा कोर्ट फी स्टॅम्प लावून अर्ज पाठविला व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १७-१०-२००७ रोजी रायगड जिल्ह्यात सन १९९० ते २००७ या कालावधीत एकाही १०० टक्के अंध व्यक्तिला स्वत धान्य दुकान मंजूर करण्यात आले नाही अशी माहिती पुरविली आहे. या साध्या माहितीकरिता त्यांनी सुमारे एक वर्षाचा कालावधी लावला आहे ही बाब योग्य नाही. तरी जिल्हाधिकारी, रायगड यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांना भविष्यात दक्ष रहाण्यासाठी सूचित करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळू भास्कर बनसोडे, रा. जामगांव, पो.रघुनाथनगर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश दत्तात्रय वाघमारे, : अपीलकर्ता
श्री स्वामी समर्थ कृपा, नागेश्वर वाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पुणे विद्यापीठ, पुणे - ०७
जन अपिलीय अधिकारी तथा :
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे - ०७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>पुणे विद्यापीठ, पुणे - ०७<br>- सौ. मेघना रामचंद्र सावंत-भोसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे - ०७ | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे - ०७ - श्रीमती अरुणा विजय चव्हाण | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०८-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-११-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२००७<br>फेरसादर दिनांक<br>०८-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तत्कालीन व सध्याच्या उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०४-०९-२००७ रोजी पाठविली आहे. यावर अपिलार्थी यांनी दिनांक ०५-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीने विद्यापीठाकडे मागितलेल्या माहितीबाबत माहितीची सर्व कागदपत्रे तपासणी करण्यासाठी उपलब्ध करुन दिली. तथापि आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी नमूद केले आहे की, त्यांना पुणे येथे येऊन कागदपत्रांची तपासणी / पडताळणी करावयाची नाही. मागितलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती हव्या आहेत. जन माहिती अधिका-याने पुढे आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस आता सर्व माहिती प्राप्त झाली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि अपिलार्थीचे दिनांक १०-०१-२०११ रोजीचे आयोगास लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगास कळविले आहे की, पुणे विद्यापीठाकडून त्यांनी मागितलेली माहिती त्यांना आता प्राप्त झाली असल्याने ते व्दितीय अपील मागे घेत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश दत्तात्रय वाघमारे, श्री स्वामी समर्थ कृपा, नागेश्वर वाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपीलकर्ता
रा.पाथरवाला बु. ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
जायकवाडी प्रकल्प, गारखेडा,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. शामराव सुंदरराव खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी (सध्याचे)- उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग -१४, वडीगोद्री,ता.अंबड, जि.जालना | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी (सध्याचे) - कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे (उत्तर) विभाग, नाथनगर, पैठण, जि. औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, कडा,औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. एम.बी.टकले, सहा.अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०२-२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९-०४-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०६-२००७ (फेरसादर दि.०२.०९.२००८) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सध्याचे जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. सध्याचे जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२५.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दि. १९.०५.२००७ रोजी पुरविण्यात आली आहे व ती अपिलार्थीस दि. २६.०५.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. ही बाब अपिलार्थीस मान्य आहे.जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज प्रथमतः अधीक्षक अभियंता यांच्याकडे सादर केला होता. त्यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमातील ६(३)(एक) च्या तरतुदीन्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर),पैठण,जि.औरंगाबाद कार्यालय या सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित केला आहे. या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यास ९० दिवसांचा विलंब झालेला आहे. या विलंबाबाबतचा खुलासा सध्याचे जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांच्यामार्फत करणे जरुरी आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ९० दिवसांच्या विलंबाने प्राप्त झाल्याबाबतचा खुलासा सध्याचे जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या स्पष्टीकरणासह अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०१-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव सुंदरराव खरात,रा.पाथरवाला बु. ता.अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग-१४, वडीगोद्री, ता.अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पंढरीनाथ विक्रम पाटील आंभोरे,<br>रा.शेलगाव, ता.बदनापूर,जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जालना | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी- श्री. पंढरीनाथ विक्रम पाटील आंभोरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११-१०-२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-०३-२००६ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०४-२००६<br>(फेरसादर दि.०१.०७.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यांपैकी कोणीही उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना सुमारे १३५ दिवसांच्या विलंबाने प्राप्त झालेली आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, जिल्हाधिकारी, जालना तथा तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २१.०३.२००६ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, "-----अर्जदार यांना जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी मागणी केलेली अपेक्षित माहिती दि.१८.१.२००६ रोजी दिली असून अर्जदार यांना उपलब्ध झाली असल्यामुळे गैरअर्जदार श्री. अविनाश पाठक जिल्हा पुरवठा अधिकारी यांना माहितीच्या अधिकाराच्या प्रकरणात यापुढे दक्षता घेण्याबाबत समज देण्यात येत आहे व अर्जदारास अपेक्षित माहिती मिळाली असल्यामुळे अर्जदाराचा अपील अर्ज निकाली काढण्यात येत असून निर्णयाची प्रत सर्व संबंधितांना देऊन प्रकरण बंद करण्यात येत आहे. "

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत समज दिलेली आहे. सबब प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील बंद करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ विक्रम पाटील आंभोरे, मु.पो.शेलगाव, ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.